दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक २६६ | गुरुवार ९ जुलै २०२६

| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com

## विज्ञान व सहजयोग...


'सहजयोग'
भाग १०३

हि कुंडलिनी शक्ती आपल्या मध्ये ,सहा चक्र आहेत वर त्या सहा चक्राना भेदून शेवटी ब्रम्हरंध्राला भेदते . हि सहा चक्र मेडिकल सायन्स प्रमाणे ,कारण मेडिकल सायन्स काही आपली पाठीच्या कण्यामध्ये जाऊन बघू शकत नाही कि ह्या शक्तीचे जे पीठ आहेत किंवा हे एनर्जी सेंटर्स आहेत त्यांना जाऊन ते बघू शकत नाहीत . पण त्या मुळे जे बाहेर त्यांना दिसत ते ते लिहितात कि आपल्या मध्ये फ्लेक्सेसेस आहेत . आणि ह्या फ्लेक्सेसेस ना नाव आहेत . पण हे कशे कार्यान्वित होतात किंवा यांचा आपापसांमध्ये काय संबंध आहे ते त्यांना काही माहित नाही . तर जेव्हा हि कुंडलिनी तुमच्या मध्य मार्गातून सहा चक्रे भेदन करून वर येते तेव्हा ह्या चक्रांमध्ये देवता आहेत . इथेच घोटाळतात सगळे साईन्टिस्ट कि देवता कशे ?आम्ही देवताला मानत नाही . तुम्ही कशालाच मानत नव्हता पूर्वी . तुम्ही हे तरी मानत होता का कि घर्षणाने आग तयार होते . हे सुध्दा मानत नव्हता . ते सिध्द झाल्यावरच मानू लागलात ना . प्रत्येक गोष्ट सिध्द झाल्यावरच मानू लागले . आता आमच्या आजीला आम्ही सांगितलं कि लोक चंद्रावर पोहोचले . तर ती म्हणे कि नाही आम्ही हे मानत नाही . असकस शक्य आहे कि लोक चंद्रावर पोहोचले . कसे काय गेले . फोटो दाखवला तर ती म्हणते हे नाटक आहे . आता आपण अजून त्या आजीच्याच डोक्याने चाललो ,जे अद्यावत गोष्ट आहे तिला न बघता त्याच जुनाट पध्दतीने त्याच्याकडे बघितलं तर सायन्स मध्ये हे लक्षात येणार नाही कारण हि गोष्ट सायन्स च्या पलीकडची आहे . सायन्सच्या वरच सायन्स आहे हे . तेव्हा ह्या देवता म्हणजे आपल्या उत्क्रांती काळातले एकेक पाऊल आहे .

१५ डिसेंबर १९८८,पुणे

www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# शरद पवारांची सरकारला साथ

## सीमाप्रश्नी उच्चाधिकार बैठक : महाराष्ट्र-कर्नाटक लढा सुरूच राहणार : मुख्यमंत्री

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी महाराष्ट्र शासन सीमाभागातील मराठी बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभे असून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरूच राहतील. सीमाभागातील मराठी बांधवांच्या न्याय्य हक्कांचे संरक्षण करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी सरकारच्या या भूमिकेचे समर्थन केले. अनेक वर्षानंतर विधान भवन येथे उपस्थित राहून त्यांनी सीमा प्रश्न आयोजित केलेल्या उच्च अधिकार बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सोबत सहभाग घेतला.



### सीमा भागातील प्रश्नाबाबत शासन संवेदनशील : शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, महाराष्ट्र -कर्नाटक सीमा भागातील मराठी भाषिक जनतेच्या प्रश्नाबाबत महाराष्ट्र शासन संवदेनशील असून हा प्रश्न सोडविण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वात हा निर्णय घेण्यात येईल. सीमा भागातील नागरिकांसाठी शासनाच्या विविध योजना राबविण्यात येतात. भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रात पाच टक्के राखीव जागा, अभियांत्रिकी प्रवेशासाठी राखीव जागा तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाकडूनही प्रवेशासाठी जागा राखीव ठेवण्यात येतात.

विधानभवन येथे महाराष्ट्र व कर्नाटक सीमाप्रश्नाबाबत उच्चाधिकार समितीची बैठक झाली बैठकीस या बैठकीला उच्चअधिकार समितीचे सदस्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, राज्यसभा सदस्य शरद पवार, लोकसभा सदस्य नारायण राणे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुशीफ,आमदार जयंत पाटील, सुरेश खाडे, सुधीर गाडगीळ, सचिन कल्याण शेट्टी, रोहित आर. पाटील, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, शशिकांत शिंदे, आमदार शिवाजी पाटील, गोपिचंद पडळकर, सदाभाऊ खोत उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नासंदर्भात अनेक वर्षांपासून सातत्याने संघर्ष सुरू आहे. मा. सर्वोच्च न्यायालयातील सीम ाप्रश्नाची सुनावणी लवकर सुरू व्हावी यासाठी वरिष्ठ कायदेतज्ज्ञ नेमणार असून कर्नाटकमध्ये मराठी बांधवांवर दाखल करण्यात आलेल्या विविध खटल्यांच्या संदर्भात त्यांना सक्षम कायदेशीर मदत उपलब्ध करून देणार आहे.


सीमाभागातील मराठी बांधवांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असून, संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे.

समितीने मांडलेल्या सर्व सूचना आणि प्रलंबित मुद्द्यांवर शासन आवश्यक ती कार्यवाही करण्यास तयार आहे. भाषिक अल्पसंख्याकांच्या आयोगाबाबतची सर्व माहिती संकलित करून महाराष्ट्रातील सर्व खासदारांना पाठविण्यात येईल,जेणेकरून हा विषय संसदेत प्रभावीपणे मांडता येईल, असे त्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयातील सीमाप्रश्नाची सुनावणी लवकर सुरू व्हावी, यासाठी राज्य शासनाच्या वतीने आवश्यक अर्ज दाखल करण्यात येतील. तसेच या प्रकरणासाठी आवश्यकतेनुसार वरिष्ठ विधिज्ञांची नियुक्ती करण्याबाबतही कार्यवाही करण्यात येईल.

शासनाचे वरिष्ठ कायदेतज्ज्ञही या प्रकरणात सक्रिय भूमिका बजावतील. कर्नाटकमध्ये मराठी बांधवांवर दाखल करण्यात आलेल्या विविध खटल्यांच्या संदर्भात त्यांना सक्षम कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन वकील नियुक्त करेल. या खटल्यांसाठी लागणारा खर्च महाराष्ट्र शासन उचलेल. या मंत्री समितीमार्फत समन्वयाची प्रभावी यंत्रणा उभी करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओम प्रकाश गुप्ता, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, महाधिवक्ता मिलिंद साठे, ॲड. शिवाजी जाधव, सहायक वकील संतोष काकडे, तज्ज्ञ समिती सदस्य दिनेश ओऊळकर, प्रकाश मरगाळे, महेश बिर्जे, ॲड. र.वि. पाटील, तसेच मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे कार्याध्यक्ष मनोहर किणेकर, उपस्थित होते.



## धरणातील पाणीसाठा दलघफूट व टक्केवारी
(ए)=एकुण. (ऊ)=उपयुक्त

| | |
|---|---|
| **अहिल्यानगर(उत्तर)** | |
| भंडारदरा (ए) ६४६४ | ५८.६५% |
| निळवंडे (ए) २७३९ | ३२.८६% |
| मुळा (ए) ८९६३ | ३४.४७% |
| आढळा (ए) ६६८ | ६३.०२% |
| भोजापुर(ऊ) ४५.०० | १२.४७% |
| **अहिल्यानगर(दक्षिण)** | |
| पिंप.जो(उ) ००.००. | ००.००% |
| (Below sill level) | |
| येडगाव(उ)१२३० | ६४.१०% |
| वडज (उ)११२० | ९५.१९% |
| माणिकडोह:(ऊ)३११० | ३०.५२% |
| डिंभे (उ) ४६५० | ३७.२४% |
| घोड (ए) १५९४ | २६.२६% |
| मां.ओहोळ(ए)२४.०० | ०५.९३% |
| घा.पारगाव(ए) ७०.०० | १६.०२% |
| सीना (ए) ७५२.०० | ३१.३३ |
| खैरी (ए)९४.०० | १७.६५% |
| विसापुर (ए)१२७.०० | १४.०२% |
| **पुणे विभाग** | |
| चासकमान(ऊ)०४२७०-५६.३७% | |
| पानशेत(ऊ)०५२०० -४५.३६% | |
| खडकवास ऊ)०१९७०-१००.००% | |
| भाटघर (ऊ)०९५००-४०.४४% | |
| वीर(ऊ)०७२८० -७७.३८% | |
| मुळशी(ऊ)१२१५० -६०.२७% | |
| पवना (ऊ) ०५५९० - ६५.७२% | |
| **जायकवाडी धरण** | |
| **एकुण** ४८०६२१ | ४६७८% |
| **ऊपयुक्त** २१९९५९ | २८६९% |

**माहिती - इंजि. हरिश्चंद्र चकोर जलसंपदा (से.नि.) संगमनेर**

# फेसबुकवरील ओळखीचा रक्तरंजित शेवट

## येरवडा जेलमधून सुटताच माथेफिरूने रचला रक्ताचा खेळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**आळेफाटा :** सोशल मीडियावरील ओळख किती महागात पडू शकते, याचा एक अत्यंत धक्कादायक आणि थरारक प्रकार जुन्नर तालुक्यातील आणे गावात समोर आला आहे. फेसबुकवर झालेल्या ओळखीचे रूपांतर वादात झाले, पोलिसांनी बेड्या ठोकल्या आणि याच रागातून येरवडा जेलम धून सुटून आलेल्या एका माथेफिरूने विवाहितेच्या पतीचा सुऱ्याने सपासप वार करून निर्घृण खून केला. बुधवार, ८ जुलै २०२६ रोजी पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या रक्तपाताने संपूर्ण पुणे जिल्हा हादरला आहे. (पान ४ वर)

### खूनी खेळाचा 'फ्लॅशबॅक'?

या थराराची पाळेमुळे फेसबुकच्या ऑनलाईन जगात रुजली होती. सविता यांची आरोपी मनोज हांडे याच्याशी फेसबुकवर ओळख झाली होती, मात्र नंतर त्याने दाते पती-पत्नीला जिवे मारण्याच्या धमक्या देण्यास सुरुवात केली. स्वाभिमानी सविता यांनी गप्प न बसता आळेफाटा पोलीस ठाण्यात मनोजविरुद्ध दोन वेळा गुन्हे दाखल केले होते. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी दाखल झालेल्या दुसऱ्या गुन्ह्याखाली पोलिसांनी मनोजला थेट येरवडा जेलची हवा खायला लावली होती.

# शेतकरी नसाल तर जमीन खरेदी नाही : चंद्रशेखर बावनकुळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** राज्यात जमीन खरेदी करायची असेल तर ती व्यक्ती 'शेतकरी' असणे बंधनकारक आहे. यापुढे शेतकरी असल्याचा वैध पुरावा दिल्याशिवाय राज्यात कुणालाही जमीन खरेदी करता येणार नाही, यासाठी संपूर्ण राज्यात जम ाबंदी आयुक्तांच्या माध्यमातून जमिनींचे 'मॅपिंग' करून नवीन कडक यंत्रणा उभारली जात आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली.

धुळ्याचे आमदार अनुप अग्रवाल यांनी धुळे जिल्ह्यातील वडजाई, पिंपरी आणि नरवहाळ येथील जमीन घोटाळ्याचा आणि परराज्यातील व्यक्तींनी नियमबाह्य जमिनी खरेदी केल्याचा प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना महसूलमंत्र्यांनी भूमाफियांचे धाबे दणाणणारे आदेश दिले.धुळे जिल्ह्यातील तक्रारीची गंभीर दखल घेत (पान ४ वर)

# लिंगनिदान प्रतिबंध कायद्याच्या कठोर अंमलबजावणीसाठी टास्क फोर्स

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** पीसीपीएनडीटी (लिंगनिदान प्रतिबंध) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, मुलींच्या जन्मदराचे संरक्षण आणि बेकायदा लिंगनिदानाला आळा घालण्यासाठी राज्य शासनाने कठोर पावले उचलली आहेत. यासाठी राज्यस्तरीय टास्क फोर्सची स्थापना, समित्यांचे पुनर्गठन, डिकॉय कारवाईला चालना आणि लोकप्रतिनिधींच्या सहभागातून देखरेख अधिक प्रभावी करण्यात येणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधान परिषदेत सांगितले.

राज्यात पीसीपीएनडीटी कायदा लागू असताना गर्भलिंग निदान आणि गर्भपात रॅकेट कार्यरत असणे याविषयी म. वि. प. नियम ९७ अन्वये सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या संदर्भात उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेत सदस्य डॉ. प्रज्ञा सातव, डॉ. मनिषा कायंदे, चित्रा वाघ, राजीव पोतदार, बच्चू कडू, विक्रम काळे, माधवी नाईक, उमाताई खापरे, भावना गवळी यांनी सहभाग घेतला.मंत्री आबिटकर म्हणाले, सदस्यांनी या विषयी मांडलेले मुद्दे महत्वाचे आहेत. डिकॉय कारवाईसाठीचे बक्षीस दहा हजारांवरून एक लाख रुपये करण्यात आले असून त्याबाबत जनजागृतीही सुरू आहे. मात्र, केवळ निर्णय घेऊन उपयोग नाही; प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रभावी झाली तरच अपेक्षित परिणाम मिळतील असेही ते म्हणाले.

# साखरेचे दर पुन्हा कडाडले

## किरकोळ बाजारात किलोमागे ५० रुपयांचा टप्पा



करण नवले । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** यंदाच्या गाळप हंगामात अपेक्षेपेक्षा कमी साखर उत्पादन झाल्याने साखर कारखान्यांवरील साठा घटला आहे. त्यातच सातत्याने वाढणारी मागणी आणि जुलै महिन्यासाठी केंद्र सरकारने जाहीर केलेला तुलनेने कमी विक्री कोटा यामुळे देशभरातील साखर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले आहे. परिणामी, कारखान्यांवरील घाऊक साखरेचे दर प्रति किलो ४१.८० रुपयांवर पोहोचले असून, किरकोळ बाजारात साखर ४५ ते ५० रुपये प्रतिकिलो दराने विकली जात आहे. (पान ४ वर)

### दरवाढीचा शेतकऱ्यांना लाभ?

गेल्या हंगामात अपेक्षेपेक्षा कमी साखर उत्पादन झाले. 'अल निनो'चा धोका व्यक्त करण्यात आल्यामुळे शेतकरी सावध भूमिकेत आहे. जून महिना कोरडा गेला. जुलैच्या पहिल्या आठवड्यात पावसाला चांगली सुरुवात झाली असली तरी पुढे पाऊस किती साथ देईल याची शाश्वती नाही. त्यामुळे उसाचे आगार असलेल्या उत्तर नगर जिल्ह्यामध्ये सरासरी २५% लागवड घटली. परिणामी पुढच्या हंगामात देखील कारखान्यांना पुरेसा ऊस मिळणार नाही. साखर उत्पादन पुन्हा कमी होण्याचा धोका आहे. त्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत साखरेचे भाव तेजीत राहतील. साखर कारखाने या दरवाढीचा किती लाभ शेतकऱ्यांना देतील, हे आताच सांगता येणार नाही. **- भास्करराव खंडागळे साखर उद्योगाचे अभ्यासक**

# भंगार व्यावसायिकावर जीवघेणा हल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शहरातील वॉर्ड क्र. २ मधील बजरंग चौक शेजारील जय भीम चौक परिसरात बुधवारी दुपारी भरदिवसा एका भंगार व्यावसायिकावर अज्ञात ५ ते ६ जणांनी दुकानात घुसून धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात समीर सुलतान शाह (रा. वॉर्ड क्र. २) हे गंभीर जखमी झाले असून, शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी साडेतीनच्या सुमारास समीर शाह हे आपल्या दुकानात काम करत असताना अचानक ५ ते ६ हल्लेखोर दुकानात घुसले. कोणतीही (पान ४ वर)

# सोनू बेगनंतर गोरख जेधेला अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शहरातील गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी जोरदार 'ॲक्शन मोडवर' पोलीस प्रशासन आली आहेत.

**श्रीरामपूर पोलिसांचा कारवाईचा धडाका सुरूच !**

तब्बल १५ गुन्हे दाखल असलेल्या सोनू बेग याला गजाआड केल्यानंतर, पोलिसांनी आपली धडक कारवाई सुरूच ठेवली आहे. मंगळवारी रात्री खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यातील फरार आरोपी गोरख जेधे याला श्रीरामपूर पोलिसांनी अटक केली आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. श्रीरामपूर पोलिसांनी सलग केलेल्या या दोन मोठ्या कारवायांमुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या ३२ वर्षीय गोरख मुन्ना जेधे यांच्यावर जानेवारी २०२५ मध्ये खुनाचा प्रयत्न आणि आर्म ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. जेधे याने शाहरूख पठाण नावाच्या युवकावर जीवघेणा हल्ला करत त्याला मारण्याचा प्रयत्न केला होता. या गुन्ह्यात तो पोलिसांना चकवा देत होता, अखेर मंगळवारी रात्री पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या. गेल्याच आठवड्यात श्रीरामपूर पोलिसांनी कुख्यात गुन्हेगार सोनू बेग याला अटक केली होती. बेग याच्यावर गंभीर स्वरूपाचे जवळपास (पान ४ वर)

# ऑपरेटरच्या हलगर्जीपणाने कंत्राटी वायरमनचा बळी; यंत्रचालक निलंबित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** बेलापूर बुद्रुक येथे ११ के.व्ही. वीजवाहिनीवरील बिघाड दुरुस्त करताना विद्युत प्रवाह अचानक सुरू झाल्याने विजेचा शॉक लागून मृत्युमुखी पडलेल्या कंत्राटी वायरमन गणेश बाळासाहेब थोरात (वय ३०, रा. उक्कलगाव) यांच्या प्रकरणी अखेर संबंधित बाह्यस्रोत यंत्रचालकाविरुद्ध श्रीरामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच संबंधित ऑपरेटर निकेत शिवाजी भोकरे याला तातडीने निलंबित करण्यात आले असून, नियमानुसार नुकसानभरपाई व अंतिम देयके देण्याचे महावितरणने आश्वासन दिल्यानंतर थोरात कुटुंबीयांनी महावितरण कार्यालयासमोर दशक्रियाविधी करण्याचा निर्णय स्थगित केला आहे.

गणेश थोरात हे 'प्रथमेश इलेक्ट्रिकल एजन्सी'मार्फत गेल्या नऊ वर्षांपासून महावितरणमध्ये कंत्राटी वायरमन म्हणून कार्यरत होते. ३० जून रोजी सकाळी बेलापूर बुद्रुक येथील कुऱ्हे वस्ती रोडवरील प्रतापराव पटारे यांच्या इमारतीसमोरील ११ के.व्ही. मेनलाईनवरील बिघाड दुरुस्त करण्यासाठी ते पोलवर चढले होते. त्याचवेळी सबस्टेशनवरील ड्युटीवरील बाह्यस्रोत ऑपरेटर निकेत भोकरे यांनी कोणतीही खातरजमा किंवा संपर्क न साधता वीजपुरवठा सुरू केल्याचा आरोप आहे. त्यामुळे गणेश थोरात यांना तीव्र विजेचा धक्का बसून त्यांचा जागीच मृत्यू झाला. (पान ४ वर)

# २४ तासांत मुळा धरणात तब्बल दीड टीएमसी पाण्याची आवक; भंडारदरा ५८ टक्क्यांवर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्याच्या पश्चिम घाट परिसरात गेल्या २४ तासांत झालेल्या मुसळधार पावसामुळे प्रमुख धरणांच्या पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. विशेषतः मुळा धरणात अवघ्या २४ तासांत सुमारे १.५ टीएमसी (१४६० दलघफूट) पाण्याची आवक झाली असून, भंडारदरा धरणाचा पाणीसाठाही ५८.६५ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या पाणीपुरवठा आणि सिंचनाच्या दृष्टीने दिलासादायक परिस्थिती निर्माण झाली आहे.



जलसंपदा विभागाचे निवृत्त अभियंता हरिश्चंद्र चकोर यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या २४ तासांत घाटघर येथे २५९ मिमी, रतनवाडी येथे १५३ मिमी, पांजरे येथे १२३ मिमी, वाकी येथे ८९ मिमी, भंडारदरा येथे ८३ मिमी, निळवंडे येथे ८१ मिमी, अकोले येथे ४६ मिमी आणि आढळा येथे १२ मिमी पावसाची नोंद झाली. पश्चिम घाटातील या मुसळधार पावसामुळे प्रवरा आणि मुळा नदीच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रम ाणावर पाणी जमा होत आहे.

संध्याकाळी ६ वाजेच्या अद्ययावत आकडेवारीनुसार, भंडारदरा धरणात ६,४७४ दलघफूट (५८.६५ टक्के) पाणीसाठा झाला आहे. निळवंडे धरणात २,२८२ दलघफूट (२७.३८ टक्के), तर मुळा धरणात ८,६८६ दलघफूट (३३.४१ टक्के) पाणीसाठा उपलब्ध आहे.

भंडारदरा धरणातून सध्या सांडव्यावरून कोणताही विसर्ग सुरू नसला, तरी पॉवर हाऊस क्रमांक २ मधून २,५०७ क्युसेक्स पाणी सोडले जात आहे.

मुळा नदीवरील कोतूळ बंधाऱ्यातून ६,९५१ क्युसेक्स विसर्ग सुरू असल्याने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

हवामान विभागाने पुढील काही दिवस घाटमाथ्यावर जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केला असल्याने जिल्ह्यातील प्रमुख धरणांच्या पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

### रणगाड्याचा पराक्रमी इतिहास

**भंडारदरा धरण (दि. ८ जुलै, सायं. ६ वा.)**

| | |
|---|---|
| पाणीसाठा | ६,४७४ दलघफूट |
| भराव | ५८.६५% |
| जलपातळी | २,४१५.८३ फूट (७३६.३४ मी.) |
| २४ तासांतील पाऊस | ८३ मिमी |
| पॉवर हाऊस-२ विसर्ग | २,५०७ क्युसेक्स |
| सांडवा व व्हॉल्व्ह विसर्ग | शून्य |
| **निळवंडे धरण** | |
| पाणीसाठा | २,२८२ दलघफूट |
| भराव | २७.३८% |
| २४ तासांतील पाऊस | ८१ मिमी |
| २४ तासांतील आवक | ४४३ दलघफूट |
| नदी व कालवा विसर्ग | बंद |
| **मुळा धरण** | |
| पाणीसाठा | ८,६८६ दलघफूट |
| भराव | ३३.४१% |
| २४ तासांतील आवक | १,४६० दलघफूट (सुमारे १.५ टीएमसी) |
| २४ तासांतील पाऊस | १८ मिमी |
| कोतूळ बंधाऱ्यातून विसर्ग | ६,९५१ क्युसेक्स |

# तारतम्याची 'मिसिंग लिंक'..!

राज्यात गेल्या आठवड्याभरापासून सुरू असलेल्या अतिवृष्टीने जनजीवन अक्षरशः विस्कळीत केले आहे. ठिकठिकाणी दरडी कोसळल्या, रस्ते बंद झाले, घरांमध्ये पाणी शिरले, वीजपुरवठा खंडित झाला आणि अनेक नागरिकांना जीव मुठीत धरून दिवस काढावे लागले. अशा गंभीर परिस्थितीत प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि लोकप्रतिनिधी यांनी एकत्रितपणे नागरिकांना दिलासा देणे अपेक्षित होते. मात्र, दुर्दैवाने या संकटकाळात सर्वाधिक चर्चा झाली ती मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पाची आणि त्याहून अधिक सत्ताधारी व विरोधकांमधील आरोप–प्रत्यारोपांची.

एका बाजूला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रकल्पाच्या गुणवत्तेचे समर्थन करत आहेत, तर दुसऱ्या बाजूला माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण या प्रकल्पाची संकल्पना काँग्रेस आघाडी सरकारची असल्याचा दावा करत पर्यावरणीय आणि सुरक्षेच्या कारणांमुळे त्यावेळी अधिक अभ्यासासाठी वेळ घेतल्याचे सांगत आहेत. या वादात प्रकल्पाचा इतिहास, तांत्रिक बाबी, मंजुरीची प्रक्रिया आणि श्रेयवाद यावर चर्चा होत आहे; मात्र नागरिकांच्या मनातील खरा प्रश्न वेगळाच आहे अतिवृष्टीच्या काळात राज्याची आपत्ती व्यवस्थापन व्यवस्था किती सक्षम आहे?

मिसिंग लिंकवर दरड कोसळली, हा नक्कीच चिंतेचा विषय आहे. मात्र, त्याचवेळी बोगद्याला कोणतीही संरचनात्मक हानी झाली नाही आणि काही तासांत वाहतूक सुरळीत करण्यात आली, हीदेखील वस्तुस्थिती आहे. दुसरीकडे, प्रकल्पाच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित करणेही लोकशाहीत विरोधकांचे कर्तव्य आहे. परंतु हे प्रश्न वैज्ञानिक पुरावे, तांत्रिक विश्लेषण आणि जबाबदार भाष्य यांच्या आधारे विचारले गेले पाहिजेत. केवळ राजकीय लाभासाठी भीतीचे वातावरण निर्माण करणे किंवा संपूर्ण प्रकल्पाला अपयशी ठरविण्याचा प्रयत्न करणे योग्य ठरत नाही.




त्याच... सत्ताधाऱ्यांनीही प्र... टीकेला राजकी... कटकारस्थान म्हणून नाकारण्याऐवजी वस्तुनिष्ठ माहिती नागरिकांसमोर ठेवली पाहिजे. मोठ्या पायाभूत प्रकल्पांमध्ये पारदर्शकता, नियमित तांत्रिक तपासणी अ... सार्वजनिक उत्तरदायित्व ही लोकशाहीतील मूलभूत तत्त्वे आहेत. त्यांचे पालन झाले, तर अनाठायी संशयालाही स्थान उरणार नाही. या संपूर्ण प्रकरणात सर्वाधिक खटकणारी बाब म्हणजे सत्ताधारी आणि विरोधकांमधील तारतम्याची लिंकच मिसिंग झाल्याचे दिसून येते. आपत्तीच्या काळात राजकारणाची भाषा बदलली पाहिजे. नागरिक संकटात असताना श्रेयवाद, टोलेबाजी आणि जुने हिशेब मांडण्यापेक्षा उपाययोजना, मदतकार्य आणि भविष्यातील प्रतिबंधात्मक नियोजन यावर भर असायला हवा. दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही.

राजकारणात मतभेद असू शकतात, विचारधारा वेगळ्या असू शकतात; पण आपत्ती ही कोणत्याही पक्षाची नसते. दरड कोसळताना ती मतदारसंघ पाहत नाही, पूर येताना तो पक्ष पाहत नाही आणि वीज खंडित होताना ती विचारधारा विचारत नाही. नैसर्गिक आपत्ती सर्वांना समान फटका देते. त्यामुळे अशा वेळी राजकीय एकजूट ही केवळ नैतिक अपेक्षा नसून प्रशासनिक गरजही असते.

आज... हवामान बदलामुळे ...ी, भूस्खलन, ढगफुटी ...णे पूर यांसारख्या घटना ...ढत आहेत. सह्याद्रीच्या ...ाटमाथ्यावर उभारल्या जाणाऱ्या प्रत्येक मोठ्या प्रकल्पासाठी केवळ बांधकामाची गुणवत्ता पुरेशी नाही; तर सातत्याने भूगर्भीय निरीक्षण, आधुनिक ...सर प्रणाली, उतारांचे ..., जलनियोजन आणि आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्था अधिक सक्षम करावी लागेल. प्रकल्प पूर्ण झाला म्हणजे जबाबदारी संपली, असा समज धोकादायक आहे.

मिसिंग लिंक प्रकल्प हा महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांमधील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. प्रवासाचा वेळ कमी करणे, वाहतुकीची सुरक्षितता वाढविणे आणि आर्थिक हालचालींना गती देणे, हे त्यामागील उद्दिष्ट आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे यश किंवा अपयश हे केवळ एका सरकारचे नसून संपूर्ण राज्याच्या विकासाशी निगडित आहे. त्यामुळे त्याकडे पक्षीय चष्म्यातून नव्हे, तर सार्वजनिक हिताच्या दृष्टीने पाहण्याची आवश्यकता आहे.

आज राज्यातील अनेक कुटुंबे पुरामुळे बेघर झाली आहेत. शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. रस्ते आणि पूल वाहून गेले आहेत. अशा परिस्थितीत नागरिकांना अपेक्षा आहे ती परस्परांवर आरोप करणाऱ्या नेत्यांची नव्हे, तर खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या नेतृत्वाची. विधानसभेतील भाषणे आणि पत्रकार परिषदांपेक्षा मदत शिबिरे, तातडीचे पुनर्वसन आणि भविष्यात अशा आपत्ती टाळण्यासाठीची ठोस कृती अधिक महत्त्वाची आहे.

लोकशाहीत सत्ताधारी आणि विरोधक हे एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. एकाने निर्णय घ्यायचे, तर दुसऱ्याने त्यावर देखरेख ठेवायची. पण या प्रक्रियेत नागरिकांचा विश्वास तुटणार नाही, याची दोघांनीही काळजी घेतली पाहिजे. मिसिंग लिंकवरील वादाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे रस्त्यावरील लिंक तांत्रिकदृष्ट्या मजबूत असू शकते; परंतु सत्ताधारी आणि विरोधकांमधील संवाद, संवेदनशीलता आणि जबाबदारीची लिंक तुटली, तर लोकशाहीचीच वाट चुकते. म्हणूनच आज गरज आहे ती श्रेयवादाची नाही, तर सहकार्याची; आरोपांची नाही, तर उत्तरदायित्वाची; आणि राजकीय संघर्षाची नाही, तर नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या परिपक्व नेतृत्वाची. मिसिंग लिंकची चर्चा पुढेही होईल; पण त्या चर्चेपेक्षा महत्त्वाचे म्हणजे राज्याच्या आपत्ती व्यवस्थापनात जबाबदारीची लिंक कधीच मिसिंग होऊ नये, हीच काळाची सर्वात मोठी गरज आहे.

# मुळा धरण आंदोलन प्रकरणी माजी मंत्री शंकरराव गडाख यांना जामीन, १६ जुलैला पुढील सुनावणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** मुळा धरणाच्या पाणी प्रश्नी२०२३ मध्ये करण्यात आलेल्या आंदोलनप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या फौजदारी गुन्हयात माजी मंत्री शंकरराव गडाख यांना नेवासा न्यायालयाने जामीन मंजूर केला असून बुधवारी दि.८ जुलै रोजी माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी नेवासा कोर्टात हजेरी लावली होती या प्रकरणाची पुढील सुनावणी १६ जुलै २०२६ रोजी होणार असून त्याकडे नेवासा तालुक्याचे लक्ष लागले आहे.



मुळा धरणाच्या पाणी प्रश्नी केलेल्या आंदोलनामुळे दाखल गुन्ह्याचा जमीन घेण्यासाठी नेवासा न्यायालयात उपस्थित मा मंत्री शंकरराव गडाख आदी

मुळा धरणाच्या पाणीप्रश्नी शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी शंकरराव गडाख यांनी ३१ऑक्टोबर २०२३ रोजी घोडेगाव चौफुला येथे जनआंदोलन केले होते. या आंदोलनाच्या दरम्यान त्यांच्यासह प्रमुख आंदोलकांविरोधात कलमान्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणात माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी नेवासा येथील न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयात हजेरी लावली. न्यायाधीश श्रीमती सुळ यांच्या न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला. त्यामुळे पुढील सुनावणीपर्यंत त्यांना दिलासा मिळाला असला, तरी खटल्याच्या कामकाजासाठी प्रत्येक तारखेला न्यायालयात उपस्थित राहावे लागणार आहे.

दरम्यान २०२३ मधील हे आंदोलन तालुक्यात मोठ्या प्रमाणावर गाजले होते. शेतकऱ्यांच्या पाणीप्रश्नासाठी गडाख यांनी समर्थक व शेतकऱ्यांसह तीव्र आंदोलन छेडल्याने तालुका व जिल्हा प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली होती. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा पवित्रा आंदोलकांनी घेतल्याने प्रशासनाने त्यांच्यावर गुन्हा दाखल केला होता.

या प्रकरणातील न्यायालयीन सुनावणी आता प्रत्यक्ष सुरू झाली असून १६ जुलै रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीकडे तालुक्यातील शेतकरी, समर्थक आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# राहुरीत उभारणार श्री छत्रपती शिवरायांचे भव्य स्मारक : आ. अक्षय कर्डिले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी :** छत्रपती शिवराय स्मारक, सीसीटीव्ही, अंतर्गत रस्ते, स्वच्छतागृहे व विविध विकासकामांसाठी आमदार अक्षय कर्डिले यांनी केलेल्या निधीच्या मागणीला उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सकारात्मक आश्वासन दिले आहे.राहुरी शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आमदार अक्षय कर्डिले यांनी भरीव विकास निधीची मागणी केली आहे. शहरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासह नागरिकांना आधुनिक आणि सुरक्षित सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध विकासकामांचे प्रस्ताव पत्राद्वारे सादर करण्यात आले आहेत. आमदार अक्षय कर्डिले यांनी राहुरी शहराच्या प्रवेशद्वाराजवळील जुन्या पाण्याच्या टाकीच्या परिसरात छत्रपती शिवरायांचे भव्य स्मारक उभारणे, वाढत्या चोरी व गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी शहरातील प्रमुख चौकांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे, विविध अंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण, सार्वजनिक स्वच्छतागृहांची उभारणी तसेच इतर नागरी विकासकामांसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. या मागणीची दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रस्तावांचा सकारात्मक विचार करून येत्या काही दिवसांत आवश्यक विकास निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिल्याची माहिती देण्यात आली. त्यामुळे राहुरी शहरातील प्रलंबित विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, आमदार अक्षय कर्डिले यांच्या पाठपुराव्यामुळे शहराच्या विकासाला नवी चालना मिळणार असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# शिष्यवृत्ती भाग्येश तुपे राज्यात चमकला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे फेब्रुवारी २०२६ मध्ये घेतलेल्या इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत श्रीरामपूरच्या डी. डी. काचोळे माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी भाग्येश स्वाती भारत तुपे याने ३०० पैकी २७६ गुण मिळवून राज्यात मानाचा सातवा क्रमांक पटकावला आहे. भैरवनाथनगरचे प्रथम लोकनियुक्त सरपंच भारत तुपे यांचा तो सुपुत्र आहे. भाग्येशने यापूर्वी आर.टी.एस. परीक्षेत राज्यात सातवा, तर डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेत राज्यात चौथा क्रमांक मिळवला होता. त्याने या यशाचे श्रेय शाळेतील शिक्षक, युनिव्हर्सल अकॅडमीचे श्री. थोरात आणि पालकांच्या मार्गदर्शनाला दिले. भाग्येशच्या या यशाबद्दल खा. भाऊसाहेब वाकचौरे, आ. हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, माजी आ. भाऊसाहेब कांबळे, लहू कानडे, संजय फंड, सचिन गुजर, डॉ. वंदनाताई मुरकुटे, बाबासाहेब दिघे, ज्ञानेश्वर मुरकुटे, नाशिक जिल्हा शिक्षणाधिकारी साईलता सामलेटी, गटशिक्षणाधिकारी संजीवन दिवे व महाराष्ट्र सेवा मंडळ संकुलाने त्याचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# खडांबे येथील श्री शाहू विद्यामंदिरचे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत राहुरी तालुक्यातील खडांबे येथील श्री शाहू विद्यामंदिर शाळेचे इयत्ता पाचवीचे विद्यार्थी शौर्य राहुल लोंढे व आयुष प्रदीप कल्हापुरे यांनी जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवून यश संपादन केले आहे.




अत्यंत प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या इयत्ता पाचवी स्कॉलरशिप परीक्षेत शौर्य राहुल लोंढे याने २३४ गुण व आयुष प्रदीप कल्हापुरे याने २३४ गुण मिळवून ग्रामीण सर्वसाधारण शिष्यवृत्ती प्राप्त केली .या विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत घेण्यात आलेल्या इयत्ता चौथीच्या मिशन आरंभ परीक्षेतही जिल्हास्तरावर उत्तुंग यश मिळवले .तसेच डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेत जिल्हास्तरावर विद्यार्थ्यांची निवड होऊन ते इस्रो सहलीसाठी सुद्धा पात्र झालेले आहेत.मंथन, लक्षवेध, सावित्रीबाई फुले प्रज्ञाशोध परीक्षेत तसेच नॅशनल स्कॉलरशिप परीक्षेत या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीमध्ये येऊन आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वास आठरे, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, विद्यालयाचे प्राचार्य आप्पासाहेब शिंदे, पर्यवेक्षक दिलीप भोरुंडे व इतर शिक्षकांनी तसेच शालेय व्यवस्थापन समिती ,शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी सर्व ग्रामस्थ तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# २२ जुलैपासून राज्यभर 'महिला शेतकरी नोंदणी अभियान' राबवा : आ. विवेक कोल्हे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव :** राज्यातील महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी २२ जुलैपासून राज्यभर 'महिला शेतकरी नोंदणी अभियान' राबविण्यात यावे, अशी मागणी आमदार विवेक कोल्हे यांनी विधानपरिषदेच्या पावसाळी अधिवेशनात केली.महिला शेतकरी सक्षमीकरणावरील चर्चेत सहभागी होताना ते म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त या अभियानाचा प्रारंभ करून राज्यभर जास्तीत जास्त महिला शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात यावी. यावेळी त्यांनी राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना', महिलांसाठी एसटी बस प्रवासातील भाडे सवलत आणि 'ड्रोन दीदी' उपक्रमाचे कौतुक केले. महिला शेतकरी प्रमाणपत्र वितरणाची प्रक्रिया अधिक सुलभ करून ती ऑनलाइन उपलब्ध करावी, तसेच महिला बचत गटांना कृषी उद्योग, प्रक्रिया उद्योग, ड्रोन तंत्रज्ञान आणि 'एक जिल्हा, एक उत्पादन' योजनेशी जोडण्याची मागणी त्यांनी केली.

# धरणात पडलेला ४० एचपी मोटर पंप अखेर बाहेर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** देवळाली प्रवरा नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजनेतील मुळा धरणात सुमारे पाच महिन्यांपूर्वी चेन ब्लॉक तुटल्याने पडलेला ४० एचपी क्षमतेचा मोटर पंप व त्यास जोडलेले पाच जी.आय. पाईप अखेर विशेष तांत्रिक मोहिमेद्वारे सुरक्षितपणे बाहेर काढण्यात नगरपरिषदेला यश आले आहे.

> **''शहरातील पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यावर कोणताही परिणाम होऊ नये, ही आमची सर्वोच्च प्राथमिकता होती. त्यामुळे पर्यायी मोटर पंपाद्वारे अखंड पाणीपुरवठा सुरू ठेवण्यात आला. धरणातून बाहेर काढलेल्या मोटर पंपाची तातडीने तांत्रिक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करण्यात येईल. त्यानंतर हा मोटर पंप राखीव स्वरूपात ठेवण्यात येणार असून भविष्यात कोणताही तांत्रिक बिघाड झाल्यास पाणीपुरवठा यंत्रणेवर त्याचा परिणाम होणार नाही.**
>
> **सत्यजित कदम**
> **नगराध्यक्ष, देवळाली प्रवरा.**

पाणी उपसा यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामादरम्यान हा मोटर पंप धरणात पडला होता. त्यावेळी धरणातील पाण्याची पातळी अधिक असल्याने पंप बाहेर काढणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नव्हते. त्यामुळे उन्हाळ्यात पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर नियोजनबद्ध पद्धतीने ही मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

दरम्यान, हवामान विभागाच्या अंदाजानुसार मान्सून उशिरा सुरू होण्याची व पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. त्यामुळे पाण्याची पातळी आणखी खाली जाईल आणि मोटर पंप बाहेर काढणे सोयीचे होईल, असा तांत्रिक अंदाज नगरपरिषदेने व्यक्त केला होता. मात्र, गेल्या पाच ते सहा दिवसांपासून धरणाच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने धरणातील पाण्याची आवक वेगाने वाढू लागली. त्यामुळे पाण्याची पातळी वाढण्यापूर्वीच मोटर पंप बाहेर काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

नगराध्यक्ष सत्यजित कदम यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी नगरपरिषदेने विशेष तांत्रिक मोहीम राबविली. धरणातील खोल पाणी, चिखलयुक्त तळ, मोटर पंपाचे मोठे वजन आणि प्रतिकूल परिस्थितीमुळे हे काम अत्यंत



आव्हानात्मक ठरले. पाणीपुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी क्रेन, स्टील वायर रोप, विशेष रस्से आणि आवश्यक यंत्रसामग्रीच्या साहाय्याने अनेक तास अथक प्रयत्न करून मोटर पंप व त्यास जोडलेले जी.आय. पाईप सुरक्षितपणे धरणाबाहेर काढले.

दरम्यान, मोटर पंप धरणात पडल्यापासून शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यावर कोणताही परिणाम होऊ नये, यासाठी नगरपरिषदेने पर्यायी मोटर पंप कार्यान्वित ठेवून अखंड पाणीपुरवठा सुरू ठेवला. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईचा कोणताही त्रास सहन करावा लागला नाही. या मोहिमेदरम्यान नगराध्यक्ष सत्यजित कदम, नगरसेवक तथा भाजप गटनेते प्रकाश संसारे आणि नगरसेवक सचिन शेटे यांनी घटनास्थळी भेट देऊन कामाची पाहणी केली तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

# कोपरगाव किंवा शिर्डीला महावितरणचे स्वतंत्र सर्कल कार्यालय सुरु करा, आ. काळेंची सरकारकडे मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** महावितरणचे सर्कल कार्यालय कोपरगाव मतदार संघापासून अहिल्यानगर येथे जवळपास ११० किलोमीटर दूर अंतरावर असल्यामुळे स्थानिक पातळीवरील कामांमध्ये प्रचंड दिरंगाई होत असून अनेक महत्त्वाची कामे प्रलंबित राहत आहेत. त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष त्रास वीज ग्राहकांना सहन करावा लागत आहे.त्यामुळे महावितरणच्या कारभाराला गती मिळावी व उत्तरेच्या तालुक्यातील वीज ग्राहकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी महावितरणचे स्वतंत्र सर्कल कार्यालय कोपरगाव किंवा शिर्डी या ठिकाणी सुरु करावे अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी विधीमंडळात सरकारकडे करून उर्जा विभागाच्या अनेक प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले.




आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव शहरासह ग्रामीण भागातील जनतेला भेडसावणाऱ्या विविध वीज समस्यांबाबत विधानसभेत जोरदार आवाज उठवला. महावितरणचे स्वतंत्र सर्कल कार्यालय कोपरगाव किंवा शिर्डीला सुरु करणे, शहरातील भूमिगत वीजवाहिन्या, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा, वीज ग्राहकांचा स्मार्ट मीटर बसविण्यास होत असलेला विरोध यांसह वीज कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत अत्यंत महत्त्वपूर्ण मागण्यांकडे आमदार आशुतोष काळे यांनी सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात सरकारचे लक्ष वेधले.

आ. आशुतोष काळे म्हणाले की, कोपरगाव शहरातील संजयनगर, सुभाषनगर, गांधीनगर, हनुमाननगर आणि गजानन नगर यांसारख्या अनेक भागात सर्वसामान्य आणि रोजंदारीवर काम करणारे, मोलमजुरी करणारी असंख्य कुटुंबे राहतात. या दाट लोकवस्तीच्या भागात वीज वाहिन्यांच्या विजेच्या खांबांमध्ये वीज प्रवाह उतरत असून त्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. या गंभीर समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी कोपरगाव शहरातील वीज वाहिन्या भूमिगत करण्याची गरज असून या भूमिगत वीजवाहिनी प्रकल्पाचा अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला आहे. सरकारने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून भविष्यात अनुचित घटना घडू नये याकरिता वीज वाहिन्या भूमिगत करण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा.

मतदार संघातील अनेक गावात शेती पंपांना रात्रीच्या वेळी वीज पुरवठा केला जात असल्याने शेतकऱ्यांना सर्पदंश, बिबट्या किंवा इतर हिंस्र प्राण्यांचे हल्ले अशा जीवघेण्या संकटाचा सामना करावा लागत आहे. शेतकऱ्यांचा जीव धोक्यात घालणारी ही रात्रीची वीज बंद करून शेती पंपांना दिवसा वीज देण्यासाठी शासनाने सौर ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून मागेल सौर उर्जा पंप योजना सुरु केली आहे. मात्र सौर ऊर्जा प्रकल्प मंजूर होवून अनेक दिवस उलटूनही सौर उर्जा प्रकल्पांचे काम अतिशय संथ गतीने सुरु आहेत. सौर उर्जा प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे जेणेकरून शेतकऱ्यांची जीवघेण्या रात्रीच्या त्रासातून मुक्तता होईल.तसेच शासनाने ७.५ एचपी पर्यंतच्या शेती पंपांना मोफत वीज देण्याची घोषणा केली आहे. तरी देखील कोपरगाव मतदार संघात महावितरणकडून काही शेतकऱ्यांना ७.५ एचपी वीज पंप धारकांना सर्रासपणे वीज बिले दिली जात आहेत ती बिले देण्यात येवू नये.

स्मार्ट मीटरबाबत नागरीकांच्या तक्रारी आहेत. स्मार्ट मीटरमुळे वीज वापर दुप्पट तिप्पट दाखवला जावून वीज बिलात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.स्मार्ट मीटरचा पेड रक्कम संपल्यानंतर वीज पुरवठा आपोआप खंडीत होत असल्यामुळे स्मार्ट मीटर बसवण्याची नागरीकांची इच्छा नसतांनाही नागरिकांना कोणतीही पूर्वकल्पना न देता, विश्वासात न घेता महावितरणकडून स्मार्ट मीटर बसवले जात आहे. त्यामुळे नागरीकांनामध्ये तीव्र नाराजी पसरली असून शासनाने या बाबीची दखल घेऊन स्मार्ट मीटर बसवण्याची सक्ती थांबवावी किंवा जनतेमध्ये जनजागृती करावी. तसेच महावितरणमध्ये कुशल,अकुशल, लाईन कर्मचारी आणि सबस्टेशन ऑपरेटर अशा अनेक कंत्राटी कामगारांच्या प्रश्नाकडे आमदार आशुतोष काळे यांनी सरकारचे लक्ष वेधले.

# पायरेन्सच्या डॉ. विखे मेमोरियल आयुर्वेदिक हॉस्पिटलचा वारीत आरोग्यसेवा उपक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** आयुर्वेद ही काळाची गरज असून त्याविषयी समाजात व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाने पंढरपूर आषाढी वारीनिमित्त सुरू केलेल्या 'चरण सेवा' उपक्रमात सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून योगदान देत पायरेन्स संस्थेच्या डॉ. विखे पाटील मेमोरियल आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, लोणी यांच्या वतीने संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पायी पालखी सोहळ्यात वारकऱ्यांसाठी विशेष आरोग्यसेवा राबविण्यात आली.



संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदामंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील , माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील , जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.शालीनीताई विखे पाटील भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील , संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुप्रिया ढोकणे पाटील तसेच पायरेन्सचे सचिव डॉ.निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

सेवा उपक्रमात आयुर्वेदिक महाविद्यालयातील तज्ज्ञ डॉक्टर, इंटर्न आणि विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करून त्यांना आयुर्वेदाच्या जीवनशैलीचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच विविध आजारांबाबत मोफत वैद्यकीय सल्ला, आरोग्यविषयक मार्गदर्शन आणि गरजेनुसार आयुर्वेदिक औषधांचे मोफत वितरण करण्यात आले.

सनाच्या 'चरण सेवा' उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवत, ''वारकऱ्यांचे आपणही काहीतरी देणे लागतो'' या सामाजिक भावनेतून ही सेवा देण्यात आली. वारीत सहभागी झालेल्या हजारो वारकऱ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. तज्ज्ञ डॉक्टर आणि विद्यार्थ्यांनी दिलेल्या सेवेमुळे वारकऱ्यांनी समाधान व्यक्त करत त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. यावेळी अनेकांनी आयुर्वेदाचे महत्त्व जाणून घेत निरोगी जीवनासाठी आयुर्वेदिक जीवनशैलीचा स्वीकार करण्याचा संकल्पही व्यक्त केला.

सामाजिक बांधिलकी, आरोग्य जनजागृती आणि निःस्वार्थ सेवाभाव यांचा संगम घडवून आणणारा हा उपक्रम वारीतील वारकऱ्यांसाठी दिलासादायक ठरला.


हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## कोंडवड-शेलगाव मार्गावर प्रथमच एसटी सेवा सुरू

**उंबरे** : राहुरी तालुक्याच्या पूर्व भागातील कोंडवड, शेलगाव, तांदुळवाडी परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांपासूनची एसटी बस सेवेची मागणी अखेर पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. आमदार प्राजक्त तनपुरे यांनी ७ जुलै रोजी श्रीरामपूर आगार व्यवस्थापकांकडे केलेल्या पाठपुराव्यानंतर राज्य परिवहन महामंडळाने ८ जुलैपासून प्रायोगिक तत्त्वावर या मार्गावर बससेवा सुरू केली आहे. राहुरी-मांजरी मुक्कामी असलेली बस राहुरी स्टेशन-तांदुळवाडी-शेलगाव-कोंडवड या मार्गावर ट्रायल बेसवर धावू लागली आहे. स्वातंत्र्यानंतर प्रथमच या भागात लालपरी दाखल झाल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या मार्गावरील विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिक्षणासाठी तसेच ज्येष्ठ नागरिकांना उपचार व शासकीय कामांसाठी राहुरी येथे ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. खासगी वाहनचालकांकडून जादा भाडे आकारले जात असल्याने आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत होता. प्रायोगिक बससेवेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्यास नियमित सेवा सुरू होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निर्णयामुळे परिसरातील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## पावसाच्या आगमनाने शेतकऱ्यांना दिलासा; गोदावरी पुन्हा वाहती



**पुणतांबा** : गेल्या दोन दिवसांपासून पुणतांबा व परिसरात झालेल्या समाधानकारक पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नाशिकच्या धरण पाणलोट क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसानंतर धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला असून, बुधवारी पहाटे सुमारे सव्वापाच वाजता गोदावरी नदीत पाणी दाखल झाले. त्यामुळे अनेक दिवसांपासून कोरडी पडलेली गोदावरी पुन्हा वाहती झाली आहे. जून महिना संपत आला तरी पावसाने दडी मारल्याने खरीप पेरण्यांबाबत शेतकरी चिंतेत होते. मात्र, गेल्या दोन दिवसांतील पावसामुळे पेरण्यांचा मार्ग मोकळा झाला असून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. गोदावरी नदीत पाणी आल्याची माहिती मिळताच ग्रामस्थांनी नदीकाठावर गर्दी करून वाहते पाणी पाहण्याचा आनंद लुटला. नदीला पाणी आल्याने नदीकाठच्या गावांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागणार आहे. समाधानकारक पावसामुळे आगामी काळात खरीप पेरण्यांना वेग येईल, अशी आशा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## नेवासा फाटा येथील स्वागत कमान जीर्ण ; दुरुस्तीची मागणी




**हंडीनिमगाव** : संभाजीनगर-अहिल्यानगर महामार्गावरील नेवासा फाटा येथे शिर्डी साईबाबा संस्थानने उभारलेली साईबाबा देवस्थानाची स्वागत कमान अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत पोहोचली असून, तिची तातडीने दुरुस्ती करावी किंवा नवीन कमान उभारावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. शिर्डीकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गावरील ही कमान अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. कमानीच्या लोखंडी संरचनेला मोठ्या प्रमाणात गंज चढला असून, काँक्रीट तडकले आहे. काही भाग मोडकळीस आल्याने ती कधीही कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे. कमानीवर खासगी जाहिरातींचा विळखा पडल्याने स्वागत संदेश झाकला गेला आहे. तसेच दिशादर्शक फलक अनेक वर्षांपासून गायब असून, साईबाबा व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या प्रतिमाही खराब झालेल्या आहेत. त्यामुळे बाहेरून येणाऱ्या भाविकांना शिर्डीकडे जाणारा मार्ग ओळखणे कठीण होत असल्याची तक्रार आहे. या संदर्भात स्थानिकांनी अनेकदा शिर्डी साईबाबा संस्थानकडे निवेदने देऊन पाठपुरावा केला, मात्र अद्याप ठोस कार्यवाही झालेली नाही. दररोज हजारो वाहने या मार्गावरून प्रवास करत असल्याने संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी तातडीने पाहणी करून कमानीची दुरुस्ती किंवा नवीन स्वागत कमान उभारावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास लोकआंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# जायकवाडी प्रकल्पातील पुनर्वसित गावांचे तातडीने सर्व्हेक्षण करा : ना.विखे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**राहुरी** : जायकवाडी प्रकल्पातील पुनर्वसित गावांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महसूल आणि जलसंपदा विभागाने एकत्रित सर्व्हेक्षण करून एक महीन्यात प्रस्ताव सादर करण्याचा सूचना जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. जायकवाडी प्रकल्पात पुर्नवसित झालेल्या शेवगाव नेवासा आणि गंगापूर तालुक्यातील गावांच्या समस्याबद्दल मंत्रालयात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.

बैठकीला मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील,आ.मोनिका राजळे आ.रमेश बोरनारे आ.विठ्ठलराव लंघे आ.अक्षय कर्डीले जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांच्यासह जलसंपदा आणि मदत व पुनर्वसन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत पुर्नवसित गावात बुडीत क्षेत्र किती आहे.असलेल्या किती जमीनीमध्ये पाणी जाते याबाबतचा ड्रोण सर्व्हे करून घेण्याचे सूचित करून,जलसंपदा व महसूल विभागाने गावांमध्ये जनसुनावणी घेवून ज्यांच्या जमीनी आहेत त्या शेतकऱ्यांची माहीती महीना भरात संकलित करून त्याचा प्रस्ताव शासनाने पाठवावा.

जमीन अदलाबदल, भोगावटा वर्ग एक करणे,तसेच पुर्नवसित गावात नसलेल्या सुविधांचा आढावा जिल्हाधिकारी यांनी घ्यावा यासंदर्भात स्वतंत्र बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले.मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी जमीनीचा सर्व्हे आल्यानंतर त्या गावातील प्रश्नाच्या संदर्भात निर्णय करण्याची ग्वाही दिली. शेतकऱ्यांच्या समस्या मांडतांना आ.मोनिका राजळे यांनी जायकवाडी प्रकल्प आधी झाला.

त्यानंतर झालेल्या कायद्यामुळे शेतकऱ्यांची मोठी समस्या निर्माण झाल्याचे सांगितले. आ.विठ्ठलराव लंघे यांनी पुर्नवसित गावांच्या समस्या मोठ्या प्रमाणात आहेत.या गावांना न्याय मिळेल असे निर्णय व्हावेत आशी अपेक्षा व्यक्त केली.

## सोनईच्या जि. प.शाळेच्या नव्या इमारतीला गळती



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनई परिसरात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे येथील महादेव मंदिर परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या नव्या इमारतीला गळती लागली आहे. काही वर्गखोल्यांच्या छतामधून पाणी झिरपत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून शैक्षणिक साहित्याचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. नवीन इमारतीतच गळती सुरू झाल्याने बांधकामाच्या दर्जावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या गंभीर परिस्थितीमुळे संतप्त पालक व ग्रामस्थांनी तात्पुरत्या स्वरूपात छतावर ताडपत्री टाकण्याची किंवा वॉटरप्रूफिंग करण्याची मागणी केली आहे. तसेच ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने पाहणी करून याचा पंचनामा करावा आणि गटविकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अहवाल सादर करावा, अशी अपेक्षा पालकांनी व्यक्त केली आहे. शाळा व्यवस्थापन समितीची बैठक घेऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी तातडीने पावले उचलण्याची गरज आहे.

## पावसाळ्याच्या ऋतूमध्ये प्रत्येकाने वृक्षारोपण करा : प्रमोद मोरे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : पावसाळ्याच्या ऋतूमध्ये जास्तीत जास्त वृक्षारोपण केल्यास व वृक्ष संवर्धनाचे काम नैसर्गिकरित्या व्यवस्थित होते त्यामुळे पावसाळ्याच्या ऋतूमध्ये प्रत्येकाने झाडे लावून वृक्षारोपण करावे असे प्रतिपादन श्रीरामपूर आगार येथे वृक्षारोपण कार्यक्रमानिमित्त निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे राज्य अध्यक्ष प्रमोद दादा मोरे यांनी केले. मंगळवार दि. ७ जुलै रोजी एसटीच्या ७८ व्या वर्धापनदिनानिमित्त ७८ हजार वृक्ष लागवडीचा संकल्प या उपक्रमाअंतर्गत निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, श्रीरामपूर आगार तसेच प्रवासी संघटना, श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीरामपूर येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

पर्यावरण संवर्धन, प्रदूषणमुक्त समाजाची निर्मिती आणि हरित महाराष्ट्र घडविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. उपस्थितांनी राज्यभर ७८ हजार वृक्ष लागवडीचा संकल्प यशस्वी करण्यासाठी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची प्रतिज्ञा केली. यावेळी निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे राज्याध्यक्ष प्रमोद मोरे, राज्य उपाध्यक्ष प्रा डॉ. अनिल लोखंडे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब डोंगरे, श्रीरामपूर आगार प्रमुख अनिल बेहेरे, प्रवासी संघटनेचे किशोर फुणगे, कार्याध्यक्षा छायाताई राजपूत, कार्याध्यक्ष निर्मलाताई मस्के, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्षा मंगल काळे, जाधव, आदर्श सरपंच बाळासाहेब ढोले,जिल्हा संघटक अर्जुन राऊत, राज्य संघटक बाळासाहेब गाडेकर, राज्य मीडिया प्रमुख प्रा. चंद्रकांत भोजने, निवेदक सोपान वायाळ, मीनाक्षीताई मोरे, वंदनाताई भोजने,सौ.स्वाती वायळ तसेच एसटी अधिकारी, कर्मचारी, प्रवासी संघटनेचे पदाधिकारी आणि अनेक पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षलागवड ही काळाची गरज असल्याचे सांगून, ऑक्सिजन देणारे जास्तीत जास्त झाडांचे वृक्षारोपण करावे तसेच समाजातील प्रत्येक घटकाने वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले. कार्यक्रमास पर्यावरण मंडळाचे पदाधिकारी सदस्य,श्रीरामपूर आगाराचे अधिकारी, कर्मचारी, पर्यावरण प्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# निळवंडे पाईपलाईन योजनेच्या चौकशीचे स्वागत

### आरोप वैफल्यातून : दुर्गाताई तांबे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : निळवंडे धरणातून संगमनेर शहरासाठी राबविण्यात आलेली थेट पाणीपुरवठा पाईपलाईन योजना नियमानुसार मंजुरी घेऊनच पूर्ण करण्यात आली असून, या योजनेबाबत करण्यात येणाऱ्या चौकशीचे स्वागत असल्याची भूमिका माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे यांनी मांडली आहे. नगरपालिकेच्या निवडणुकीतील पराभवानंतर वैफल्यग्रस्त झालेल्या नव्या लोकप्रतिनिधींनी शहराची राज्यभर बदनामी करण्यासाठी तथ्यहीन आरोप केल्याचा आरोप त्यांनी प्रसिद्धीपत्रकातून केला.

तांबे म्हणाल्या की, २००९ मध्ये नगरविकास विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व संबंधित विभागांच्या मंजुरीनंतर ही योजना राबविण्यात आली. शासनाच्या निर्देशानुसार कार्यादेश देण्यात आला असून, आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती. योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर थर्ड पार्टी ऑडिट करूनच संबंधित बिलांचे भुगतान करण्यात आले आहे. त्यामुळे अनियमिततेचे आरोप निराधार असल्याचा दावा त्यांनी केला. संगमनेर शहराला या योजनेमुळे नियमित, स्वच्छ व मुबलक पाणी मिळत असल्याचे सांगत, चौकशीतून सत्य समोर येईल आणि खोटे आरोप करणाऱ्यांचे दावे फोल ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### नगरपालिका निवडणुकीतील पराभवातून आरोप

संगमनेर शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे यांनीही नव्या लोकप्रतिनिधींवर टीका करत, नगरपालिकेच्या निवडणुकीत मोठा पराभव झाल्याने वैफल्यातून हे आरोप केले जात असल्याचा दावा केला. शहरासाठी निधी आणण्याऐवजी बदनामीचे राजकारण सुरू असल्याचे त्यांनी म्हटले.

### प्रशासकीय बाबींना प्रशासक जबाबदार

नगर परिषदेचे कामकाज करताना प्रशासकीय बाबींची जबाबदारी ही प्रशासनाची म्हणजे मुख्याधिकाऱ्यांची असते. यामध्ये नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, किंवा नगरसेवकांचा यांचा कोणताही संबंध नसतो. यामुळे प्रशासकीय बाबींबाबत प्रशासकीय अधिकारी उत्तर देतील. यामध्ये नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष यांचे नाव घेऊन संगमनेरला बदनाम करणाऱ्या या प्रवृत्तीचा आम्ही तीव्र निषेध करतो

**विश्वासराव मुर्तडक, माजी नगराध्यक्ष**

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील भ्रष्ट अधिकाऱ्यावर शासनाकडून कारवाई

### काँग्रेसचे संभाजी माळवदे यांच्या पाठपुराव्यास यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील भ्रष्ट अधिकाऱ्यांविरोधात राज्य सरकारने कठोर भूमिका घेत चार अभियंत्यांचे निलंबन करत घरचा रस्ता दाखवत मोठी कारवाई केली. यात दोन कार्यकारी अभियंता व दोन उपाभियंत्यांचा समावेश आहे.

राज्यभरात जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेल्या हजारो कोटींच्या कामात प्रशासन व ठेकेदार यांनी मिळून केलेला भ्रष्टाचार, कामे पूर्ण करण्यास झालेला विलंब,निकृष्ट दर्जाची कामे. कामातील अनियमितता या सर्व बाबींची समितीने केलेली चौकशी व सतत्यता समोर आल्याने हीं कारवाई करण्यात आल्याचे समजते. मजीप्रा मधील घोटाळ्याचा काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी तब्बल तीन वर्ष पाठपुरावा केला. याविरोधात अनेकदा आंदोलने केली. मजीप्राच्या नेवासा कार्यालयासमोर,अहिल्यानगर कार्यालयासमोर धरणे आंदोलने, टाळे ठोकण्याचे आंदोलने केली.राज्य सरकारकडे याबाबत चौकशीसाठी तक्रारी केल्या. शेवटी याविरोधात औरंगाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. माळवदे यांनी याबाबत पावसाळी अधिवेशनात नेवासा विधानसभेचे आमदार विठ्ठलराव लंघे यांना प्रश्न देखील उपस्थित करण्यासाठी निवेदन दिले.

या सर्व पाठपुराव्यामुळे सरकारने समिती स्थापना करून चौकशी करत अहिल्यानगर मजीप्रा मधील चार अभियंत्याना निलंबित करत मोठी कारवाई केली.

### निलंबित केलेल्या या अधिकाऱ्यामध्ये

एस.एस. दहिफळे ( उपअभियंता नेवासा ),एम.पी.धगधगे (तत्कालीन उपाभियंता नेवासा ) जी.एस.भोगावडे (कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर ) एस. आर.वारे ( तत्कालीन कार्यकारी,अभियंता अहिल्यानगर ) यांचा समावेश आहे.अजूनही मोठे अधिकारी यात समावेश असल्याची बातमी समोर येत आहे समिती करत असलेल्या चौकशीतून जी सत्यता समोर येईल त्यावरून घोटाळ्याची व्याप्ती व घोटाळे बहाद्दरांचे चेहरे समोर येईल. व शासन काय कारवाई करणार हेही जनतेला काही दिवसात दिसून येईल.

### आझाद मैदानावर आंदोलन करणार

या भ्रष्टाचाराची व्याप्ती अहिल्यानगर जिल्ह्यापूर्ती मर्यादित नसून पूर्ण राज्यभर आहे. हजारो कोटींचा घोटाळा असून पूर्ण राज्यातील घोटाळे बहाद्दरावर कारवाई जोपर्यंत होत नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही. याविरोधात लवकरच मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन करणार.

**- संभाजी माळवदे**
**महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी.**

### जाहिर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः सौंदाळा परिसरातील लोकांना, तसेच नेवासा तालुक्यातील लोकांना या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

मौजे सौंदाळा ता. नेवासा येथील सुनिल दादासाहेब आरगडे हे दिनांक २२/०५/२०२६ रोजी मौजे सौंदाळा ता. नेवासा येथे मयत झालेले झालेले आहेत. त्यांना त्यांच्या पत्नी श्रीमती सुनिता सुनिल आरगडे ह्या एकमेव कायदेशीर वारस आहेत. सदर मयत सुनिल आरगडे यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या नावावर टाटा कंपनीचा दहा टायर ट्रक त्याचा आर.टी.ओ पासिंग नंबर MH16AY7373 असा असुन त्याचा चेसीज नंबर MAT448035C7J37261 हा ट्रक तसेच महिंद्रा कंपनीची स्कॉर्पिओ तिचा आर.टी.ओ. पासिंग नंबर MH17AJ9096 ही मयत सुनिल दादासाहेब आरगडे यांच्या नावावर होती. वर नमुद दोन्ही गाड्यांची आर.सी.बुक हे हरवलेले आहेत. सदर वर नमुद दोन्ही वाहने मयत सुनिल दादासाहेब आरगडे यांच्या नावावरुन त्यांची कायदेशीर पत्नी सुनिता सुनिल आरगडे यांच्या नावावर होणे अत्यंत जरुरीचे आहे. तथापि, सदर वर नमुद वाहनांच्या हरवलेल्या आर.सी.बुक बाबत, तसेच मयत सुनिल आरगडे यांच्या कायदेशीर वारस सुनिता सुनिल आरगडे यांच्या नावावर सदर वाहनांचे आर. सी.बुक करण्याबाबत कुणाचीही काहीएक हरकत असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत श्रीमती सुनिता सुनिल आरगडे, रा. सौंदाळा, ता. नेवासा यांचेशी तथा त्यांचे खालील नमुद विधीज्ञ यांचेशी संपर्क साधावा. सदर ७ दिवसामध्ये कोणाचीही काहीएक हरकत न आल्यास आमचे अशिल सदरची वर नमुद वाहने स्वतःच्या नावावरं करुन घेतील, त्यांनतर कुणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.


नेवासा
दिनांक :-०७/०७/२०२६

शिक्का

**नोटीस देणार तर्फे**
**ॲड. सुजित बाळकृष्ण गरड**
**नेवासा कोर्ट, नेवासा ता. नेवासा,**
**जि. अहिल्यानगर**
**मोबा नं. ९८५०१६६१८७**

# मांडवे पूल पाण्याखाली, मुळानदीला महापूर

### संगमनेर-पारनेरचा संपर्क तुटण्याची शक्यता



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**साकूर** : अकोले तालुक्यातील हरिश्चंद्रगडाच्या पायथ्याशी मुळा नदीच्या पाणलोट क्षेत्रात मंगळवारी झालेल्या दमदार पावसाने मुळा नदीला मोठा महापूर आला आहे.

सध्या नदी दुथडी भरून वाहत असून, वेगात पाणी मुळा धरणाच्या दिशेने झेपावत आहे. दरम्यान, नदीपात्रातील आवक वाढती असून, संगमनेर-पारनेरला जोडणारा मांडवे पूल पाण्याखाली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहेत.

गेल्या दोन-तीन दिवसांपासून अकोलेसह संगमनेर तालुक्यात दमदार पावसाने हजेरी लावली आहे. यामुळे मुळा नदी दुथडी भरून वाहू लागली आहे. मांडवे पूल हा संगमनेर- पारनेर तालुक्यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा असून या मार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. सध्या पुलाखालून अंदाजे १० ते १२ फूट पाणी वाहत असून पाण्याची पातळी वेगाने वाढत आहे. ही वाढ अशीच आवक सुरू आहे. ही आवक अशी राहिल्यास पूल कोणत्याही क्षणी पाण्याखाली जाऊ शकतो.

त्यामुळे संगमनेर-पारनेर मार्गावरील वाहतूक विस्कळीत होऊन दोन्ही तालुक्याचा संपर्क तुटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, मुळा नदीला आलेला पूर पाहण्यासाठी नागरिकांनी मांडवे येथे पुलावर मोठी नागरिकानी मोठी गर्दी केली आहे.

अनेक दुचाकी व चारचाकी वाहने पुलावर थांबविल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. संभाव्य धोका लक्षात घेता नागरिकांनी विनाकारण पुलावर गर्दी करू नये किंवा थांबू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु एसआर/ १८४/२०२६
नेवासा दिनांक. ०७/०७/२०२६

अर्जदार श्री श्रीम-बाळु सर्जेराव वाघ रा. घोडेगांव ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री श्रीम. कु. चांदणी बाळु वाघ रा. घोडेगांव ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव - चांदणी बाळु वाघ, गावाचे नाव-जेऊर हैबती, जन्म दिनांक-२०/०२/२०१२ करिता

या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी ज़न्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहीर नोटीस

तहसिल कार्यालय कोपरगांव
क्र . कावि/फौजदारी/हस्ते/२०२६
कोपरगांव दि.०३/०७/२०२६

कोपरगांव येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात.
बुशराबी सिकंदर खान
रा. कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर,
**विरुध्द**
निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद कोपरगांव ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर

ज्याअर्थी, अर्जदार बुशराबी सिकंदर खान रा. कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये अर्जदार नामे बुशराबी सिकंदर खान यांचे आई दिनांक. ०१/०७/१९७२ रोजी मौजे. कोपरगांव ता. कोपरगांव येथे प्रसुत होऊन अर्जदार नामे बुशराबी सिकंदर खान यांचा जन्म झाला आहे. अर्जदार यांचे जन्माची नोंद नगरपरिषद कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांचेकडे अनावधानाने करावयाची राहुन गेली आहे. तथापी अर्जदार यांचे जन्माची नोंद जन्म मृत्यु रजिष्टरला नोंद होण्याकामी तसा मे. कोर्टचा आदेश होण्याकामी चौकशी अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये, अर्जदार यांचा जन्म दिनांक. ०१/०६/१९७२ रोजी मौजे. कोपरगांव ता. कोपरगांव येथे झाला आहे. अर्जदार यांचे जन्माची नोंद नगरपरिषद कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर, येथे होण्याबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्री पुराव्यांसह सदरची हरकत मे. कोर्टासमोर हजर होवून पुराव्यानिशी दाखल करावी. अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही. असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करेल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालनार नाही. याची जाहीर नोंद या जाहीर नाम्याने घेण्यात यावी, कळावे.

आज दि.०३/०७/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिले.

**हुकूमावरुन**
**तहसिलदार कोपरगांव**

## पान १ वरुन

### सोनू बेगनंतर गोरख जेधेला अटक

१५ गुन्हे दाखल आहेत. या मोठ्या कारवाईची चर्चा शहरात सुरू असतानाच, पोलिसांनी गोरख जेधेला अटक करून गुन्हेगारांना स्पष्ट इशारा दिला आहे. ही धडक कारवाई अहमदनगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली, श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विशाल खैरे आणि त्यांच्या पथकाने केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करत आहेत. शहरात पोलिसांच्या कारवाईचे स्वागत श्रीरामपूर पोलिसांनी लागोपाठ दोन मोठ्या गुन्हेगारांना अटक केल्याम ुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत होत असल्याचे चित्र आहे. पोलिसांच्या या धडक कारवाईचे नागरिकांमधून जोरदार स्वागत होत आहे.

### फेसबुकवरील ओळखीचा रक्तरंजित शेवट

या हल्ल्यात तुषार रामदास दाते (वय ३८) यांचा जागीच मृत्यू झाला आहे. याप्रकरणी आळेफाटा पोलिसांनी तात्काळ पावले उचलत आरोपी मनोज महादेव हांडे (रा. चैतन्यपूर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आणे गावातील दाते कुटुंब नेहमीप्रमाणे पहाटे ५:१० वाजता उठून घराशेजारील गोठ्यात गाईंचे दूध काढण्याच्या आणि चाऱ्याच्या कामात व्यस्त होते. सकाळी ६ च्या सुमारास पती तुषार हे गाईंना खाण्यासाठी घरामागून ऊस आणायला गेले. अचानक त्यांच्या ओरडण्याचा आवाज आला. पत्नी सविता यांनी धावत जाऊन पाहिले तर समोर काळजाचा थरकाप उडवणारे दृश्य होते. हातात मोठा सुरा घेऊन आरोपी मनोज हांडे हा तुषार यांच्यावर पिसाळल्यासारखे वार करत होता. पोटात, पाठीवर, छातीत सुरा खुपसल्यामुळे तुषार रक्ताच्या थारोळ्यात कोसळले.पतीला मरणाच्या दारात पाहून पत्नी सविता यांनी जीवाची पर्वा न करता थेट आरोपीच्या हातातील सुरा पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, रक्ताळलेल्या डोळ्यांच्या मनोजने सविता यांच्यावरही सुरा उगारला. त्यांनी स्वतःला वाचवत घराकडे पळ काढला, आरोपी सुरा हवेत फिरवत त्यांच्या मागेही धावला. सुदैवाने, आरडाओरड ऐकून सासू आणि दीर घराबाहेर धावून आले. त्यांना पाहताच आरोपीने मागच्या बाजूने पळ काढला. गंभीर जखमी तुषार यांना महेश मेमोरियल हॉस्पिटलमध्येनेण्यात आले, पण उपचारापूर्वीच त्यांचा श्वास थांबला होता. बदल्याची आग आणि कट –पोलिसांच्या कारवाईमुळे आरोपी मनोजच्या मनात दाते कुटुंबाविषयी कमालीचा आकस निर्माण झाला होता. अवघ्या एका महिन्यापूर्वी तो जेलमधून जामिनावर बाहेर आला. बाहेर येताच त्याने बदला घेण्याचे ठरवले. तो दाते यांच्या घराभोवती दबा धरून लपून बसला होता आणि आज पहाटे तुषार एकटे सापडताच त्याने हा गेम केला.

### शेतकरी नसाल तर जमीन खरेदी नाही : चंद्रशेखर बावनकुळे

महसूलमंत्र्यांनी सांगितले की, विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र यंत्रणा उभी करून या व्यवहारांची चौकशी केली जाईल. प्राथमिक तपासणीत दोन प्रकरणांमध्ये शेतकरी असल्याचा पुरावा मिळालेला नाही. आमदार अग्रवाल यांनी सादर केलेले तहसीलदारांचे शिक्के असलेले उतारेही बनावट असण्याची शक्यता असल्याने, संपूर्ण प्रकरणाचा तपास धुळे पोलीस अधीक्षकांमार्फत केला जाईल. फसवणूक, बनावट नोंदी आणि सरकारी रेकॉर्डमध्ये फेरफार करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग आणि मोपा विमानतळाच्या आसपास राज्याबाहेरील लोकांनी मोठ्या प्रमाणात जमिनी घेतल्याचा मुद्दा जयंत पाटील यांनीही उपस्थित केला होता. या पार्श्वभूमीवर महसूलमंत्र्यांनी संपूर्ण राज्यासाठी मोठा निर्णय जाहीर केला.आता राज्यातील सर्व मुद्रांक अधिकाऱ्यांना जमाबंदी आयुक्तांच्या डेटाबेसचा थेट 'ॲक्सेस' देण्यात आला आहे. यामुळे कोणतीही व्यक्ती जमीन नोंदणीसाठी आली, तर तिच्या नावावर राज्यात इतरत्र जमीन आहे का आणि तिचा सातबारा कुठे आहे, याची संपूर्ण माहिती मुद्रांक अधिकाऱ्याला जागेवरच उपलब्ध होईल. राज्याबाहेरील शेतकरी नसलेली व्यक्ती संशयास्पद आढळल्यास तिची नोंदणी तात्काळ रोखून पडताळणी केली जाईल. या नवीन सिस्टीममुळे बोगस शेतकरी बनून जमिनी हडप करणाऱ्यांच्या साखळीला पूर्णपणे लगाम बसेल, असा विश्वास महसूलमंत्री बावनकुळे व्यक्त केला.

### साखरेचे दर पुन्हा कडाडले

केंद्र सरकारने जुलै महिन्यासाठी २२ लाख टन साखर विक्रीचा कोटा जाहीर केला आहे. जुलै महिन्यातील विविध सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर हा कोटा बाजाराच्या अपेक्षेपेक्षा कमी असल्याने घाऊक बाजारात दरवाढ झाली आहे. जून महिन्यात साखरेचे घाऊक दर ४,१५० ते ४,१८० रुपये प्रति क्विंटल होते. मात्र, जुलैच्या सुरुवातीलाच हे दर वाढून ४,३५० ते ४,३८० रुपये प्रति क्विंटलवर पोहोचले असून, प्रति क्विंटल सुमारे २०० रुपयांची वाढ नोंदविण्यात आली आहे.

कमी उत्पादनामुळे अनेक साखर कारखान्यांकडे शिल्लक साठा मर्यादित राहिला आहे. नव्या हंगामातील साखर बाजारात येण्यासाठी अजून काही महिन्यांचा कालावधी असल्याने सध्या पुरवठ्यावर मर्यादा आहेत. मागणीच्या तुलनेत उपलब्धता कमी असल्यामुळे बाजारातील तेजी काही काळ कायम राहण्याची शक्यता असल्याचे दि पूना मर्चंट्स चेंबरचे सचिव ईश्वर नहार यांनी सांगितले.दरम्यान, विद्यमान साखरसाठा नव्या हंगामापर्यंत पुरेसा असून बाजारात साखरेचा कोणताही तुटवडा नाही. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेचे दर कमी असल्याने सध्या निर्यातही मर्यादित आहे. त्यामुळे पुढील काही महिन्यांत साखरेच्या दरात स्थिरता येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### भंगार व्यावसायिकावर जीवघेणा हल्ला

शाब्दिक बाचाबाची न होता त्यांनी शाह यांच्यावर धारदार शस्त्रांसह लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या हल्ल्यात त्यांच्या छाती, पाय व पाठीवर गंभीर जखमा झाल्या. हा थरार शाह यांच्या मुलासमोर घडल्याचे सांगण्यात आले. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत जखमी शाह यांना साखर कामगार रुग्णालयात दाखल केले. प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी लोणी येथील प्रवरानगर रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच श्रीरामपूर शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून पोलीस विविध अंगांनी तपास करीत आहेत. विशेष म्हणजे, नुकतेच अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील सराईत गुन्हेगारांचे समुपदेशन करण्यात आले होते. त्यानंतरही भरदिवसा अशी गंभीर घटना घडल्याने पोलिसांच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या हल्ल्यामुळे व्यापारी वर्गासह नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, संबंधित आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### ऑपरेटरच्या हलगर्जीपणाने कंत्राटी वायरमनचा बळी; यंत्रचालक निलंबित

या प्रकरणी गणेश यांचे चुलत बंधू अभिजित भाऊसाहेब थोरात यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १०६(१) अन्वये हलगर्जीपणामुळे मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक चौकशीनंतर आरोपी ऑपरेटर निकेत भोकरे याला सेवेतून निलंबित करण्यात आल्याची माहिती महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिली. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, विद्युत निरीक्षकांचा अहवाल आणि शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला नुकसानभरपाई दिली जाईल. तसेच संबंधित कंत्राटदार 'प्रथमेश इलेक्ट्रिकल एजन्सी'ला दोषींविरुद्ध आवश्यक कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले असून, गणेश थोरात यांच्या कुटुंबाला अंतिम देयके तातडीने अदा करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. या आश्वासनांनंतर महावितरण कार्यालयासमोर दशक्रियाविधी करण्याचा निर्णय स्थगित करण्यात आल्याची माहिती गणेश यांचे चुलत बंधू संतोष थोरात यांनी दिली. दरम्यान, या घटनेमुळे उक्कलगाव व बेलापूर परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# ग्रंथराज ज्ञानेश्वरी पायी पालखी दिंडीचा पहिला रिंगण सोहळा माऊलींच्या कर्मभूमीत रंगला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा:** संत ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी व ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे रचनास्थान असलेल्या तीर्थक्षेत्र नेवासा येथील ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी सोहळा दिंडीचे बुधवारी दि.८ जुलै रोजी संत महंतांच्या उपस्थितीत दुपारी ३.३० च्या सुमारास पंढरपूरकडे जाण्यासाठी प्रारंभ करण्यात आला.संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख महंत गुरुवर्य वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री, गंगापूर येथील गाथा मूर्ती हभप रामभाऊ महाराज राऊत,शेवगाव तालुक्यातील हभप राम महाराज झिंजूर्के हे या दिंडीचे नेतृत्व करत आहे.नेवासा येथून निघालेल्या माऊलींच्या या पालखी दिंडीत सुमारे तीस दिंडयांसह हजारो वारकऱ्यांनी सहभाग नोंदवला आहे.माऊलींच्या कर्मभूमी असलेल्या नेवासेनगरीत आषाढी दिंडी सोहळयातील पहिला रिंगण सोहळा वारकऱ्यांनी यावेळी एस टी स्टॅण्ड प्रांगणात साजरा केला.

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ''पैस'' खांब मंदिराचे निर्माते वैकुंठवाशी ह.भ.प.बन्सी महाराज तांबे यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या या दिंडीच्या प्रस्थानापूर्वी माऊलींच्या पादुकांचे व ''पैस'' खांबाचे पूजन श्री क्षेत्र देवगड संस्थानचे महंत राष्ट्रसंत गुरुवर्य श्रीभास्करगिरीजी महाराज,सद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक,आळंदी येथील हभप ज्ञानेश्वर माऊली कदम महाराज,वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री, त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत श्री रमेशानंदगिरीजी महाराज,मध्यमेश्वर देवस्थानचे महंत ऋषिनाथजी महाराज,रामकृष्ण विवेकानंद आश्रमाचे स्वामी श्री ज्ञानेश्वरजी महाराज दिंडी चालक राम महाराज झिंजुरके यांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात करण्यात आले. संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर प्रांगणातून पालखी दिंडी सोहळयास प्रारंभ झाला यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील व सौ. रत्नमालाताई लंघे पाटील,देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग,माजी आमदार नरेंद्र घुले पाटील, बाळासाहेब मुरकुटे,शंकरराव लोखंडे,शिवसेनेचे युवा नेते प्रभाकरराव शिंदे, युवा नेते उदयनदादा गडाख पाटील, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले डॉ.क्षितिज घुले,नेवासा मार्केट कमिटीचे सभापती नंदकुमार पाटील,अँड.संजय सुखदान व सर्व नगरसेवकांच्या हस्ते पालखी रथातील पादुकांचे पूजन करण्यात आले. दिंडीद्वारे नगरीला प्रदक्षिणा घालण्यात आली. नेवासा शहरात सदर दिंडीचे चौकाचौकात फटाक्यांची आतषबाजी व तोफांची सलामी देत व्यापारी,नागरिक महिला सुवासिनींनी रांगोळ्या घालून स्वागत केले.सदरची दिंडी नगरपंचायत चौकात आल्यानंतर स्वर्गीय राजेंद्र मापारी मित्र मंडळाच्या वतीने जेसीबीद्वारे पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. नगरसेवक स्वप्नील मापारी यांच्या वतीने उपस्थित संत महंतांचे संतपूजन करण्यात आले. एस टी स्टॅण्ड प्रांगणात राज्यातील दुसरा तर सोहळयातील पहिला रिंगण सोहळा वारकऱ्यांनी सजरा केला. यावेळी नेवासा आगाराच्या वतीने आगार व्यवस्थापक प्रशांत होले अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नेवासा प्रेस क्लब व उपस्थित पत्रकारांच्या वतीने पालखीचे पूजन करून पालखी सोहळयात नेतृत्व करणाऱ्या देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांचे संतपूजन करण्यात आले.यावेळी अश्व रिंगण,झेंडा रिंगण,टाळ मृदुंग रिंगण,भजनी मंडळातील महिलांचे रिंगण ज्ञानोबा माऊली तुकारामच्या गजरात पार पडले.



नेवासा येथील ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी दिंडी सोहळयाचे बुधवारी पंढरपूरकडे प्रस्थान झाले संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर प्रांगणात जमलेली वारकऱ्यांची मांदियाळी तर एस टी स्टॅण्ड प्रांगणात राज्यातील दुसरा रिंगण सोहळयात सहभागी झालेले वारकरी भाविक दिसत आहे(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)

# गंगापूर येथे मुलींच्या शासकीय वस्तीगृहासाठी प्रस्तावित जागेची पाहणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** समाज कल्याण विभागाच्या वतीने २.६९ कोटी रुपये खर्चून गंगापूर येथे नव्याने मंजूर झालेल्या १०० मुलींच्या शासकीय वस्तीगृहाच्या इमारतीसाठी प्रस्तावित जागेची आज पाहणी करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते वाल्मिक शिरसाठ यांच्यासह छत्रपती संभाजीनगर विभागाचे समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त रवींद्र शिंदे, निरीक्षक महेश पाटील तसेच गंगापूरचे ग्राम महसूल अधिकारी गणेश लोणे उपस्थित होते.



समाज कल्याण विभागामार्फत उभारण्यात येणाऱ्या या वस्तीगृहात सामाजिक न्याय विभागांतर्गत येणाऱ्या सर्व प्रवर्गांतील १०० विद्यार्थिनींना मोफत निवास, भोजन, शैक्षणिक साहित्य, अभ्यासासाठी आवश्यक सुविधा तसेच सुरक्षित व दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे गंगापूर तालुक्यासह परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना उच्च शिक्षणासाठी मोठा आधार मिळणार आहे. इमारत पुढील वर्षभरात उभी करण्याचा मनोदय यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

सामाजिक कार्यकर्ते वाल्मिक शिरसाठ यांनी गंगापूर येथे समाज कल्याण विभागाच्या वतीने निवासी शाळाही मंजूर करण्यात यावी, अशी मागणी केली. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना एकाच ठिकाणी दर्जेदार शिक्षण व निवासाची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असून, भविष्यातही हा पाठपुरावा अधिक प्रभावीपणे सुरू राहील, असे त्यांनी सांगितले.

गंगापूर येथे उभारण्यात येणारे हे शासकीय वस्तीगृह विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असून, ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरेल, अशी प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

## कृषी कन्यांनी दिली शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकातून बीज प्रक्रियेची माहिती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय दहेगाव अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत कृषी कन्यांनी बेंदवाडी येथे शेतकऱ्यांना बीज प्रक्रियेची प्रात्यक्षिक द्वारे माहिती दिली. यावेळी भुईमूग,तूर व इतर घरगुती बियाण्याच्या प्रक्रियेबद्दल कृषी कन्यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली.पेरणीपूर्वी बियाण्यावर योग्य प्रकारे बुरशीनाशक, कीटकनाशक किंवा जैविक घटकांची प्रक्रिया केल्यास बीजजन्य व जमिनीतील रोगांपासून संरक्षण मिळते. यामुळे



उगवण चांगली होते, रोपे सशक्त वाढतात आणि उत्पादनात वाढ होते. तसेच रासायनिक किंवा जैविक प्रक्रिया करताना आवश्यक सुरक्षितता पाळण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस.बैनाडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. बी. बडे व विषयतज्ञ डॉ. बी. पी. बिरारी यांचे मार्गदर्शन लाभले.या उपक्रमात कृषी कन्या क्षितिजा गुंजाळ , प्रियांका मोईन , वैष्णवी गायकवाड, रोशनी सदावर्ते, तेजस्विनी घोडके, पूजा पगारे, भूमिका खुडे, साक्षी राऊत, राणी राठोड यांनी सहभाग नोंदवला. या प्रसंगी बेंदवाडी गावातील शेतकऱ्यांनी सहकार्य केले.

## वैजापूर तालुक्यात ७५ टक्के पेरण्या पूर्ण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या मोसमी पावसामुळे वैजापूर तालुक्यात खरीप हंगामातील आला असून आतापर्यंत तालुक्यात ७५ टक्के उरकल्या आहेत. येत्या काही दिवसातच उर्वरित पेरण्यांची कामे पूर्ण होणार असून त्या अनुषंगाने बळीराजा बी बियाणे, खते पेरणी या कामात गुंतला आहे. जून महिन्यात मृग नक्षत्र पूर्णपणे कोरडे गेले असले तरी जवळपास दहा दिवस पावसाने दमदार हजेरी लावल्याने जूनची सरासरी ओलांडून ११२.२० मिमी पाऊस पडला. त्यामुळे शेतकऱ्यांनी झपाट्याने पेरणीची कामे उरकण्यास सुरुवात केली. परिणामी आतापर्यंत सुमारे एक लाख एक हजार ७२१ हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या असून यात मका व कपाशीचे प्रमाण लक्षणीय आहे. तालुक्यात एक लाख ३४ हजार ८९४ हेक्टर क्षेत्र पेरणीलायक असून यातील सुमारे ४२ हजार ७०८ हेक्टर क्षेत्रावर आतापर्यंत मका पेरणी झाली आहे तर सुमारे ३५ हजार ९१५ हेक्टर क्षेत्रावर कपाशीची पेरणी झाली आहे. यंदा उशिरा पाऊस पडल्याने मकाच्या क्षेत्रात घट होण्याची अपेक्षा असताना शेतकऱ्यांनी पुन्हा कपाशीच्या ऐवजी मकाला पसंती दिल्याचे चित्र सध्या तालुक्यात असून आतापर्यंत उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार कपाशीपेक्षा तब्बल सहा हजार ८०० हेक्टर अधिक क्षेत्रावर मका पेरणी झाली आहे. मकाला मिळत असलेली आधारभूत किंमत व कापशीच्या भावातील अनिश्चितता या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचा कल मका पेरणीकडे अधिक असल्याचे दिसते. मका व कपाशीशिवाय शेतकऱ्यांनी बाजरी, ज्वारी, तूर, उडीद, मूग, सोयाबीन, भुईमूग, ऊस ही पिके देखील घेतली आहेत. यात आतापर्यंत सात हजार ३४३ हेक्टरवर तुरीची लागवड करण्यात आली आहे. चार हजार ७६४ हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी झाली आहे तर जवळपास दोन हजार दोनशे हेक्टर क्षेत्रावर बाजरी पेरणी झाली आहे. जुलै महिन्यात साधारणपणे १०६.५ मिमी पाऊस पडतो. या महिन्यात तालुक्यात सहा दिवस पाऊस पडला असून आतापर्यंत ४३.१ मिमी पावसाची नोंद झाली आहे. अजूनही काही भागात शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा आहे. तालुक्यातील बहुतांश छोट्या व मध्यम प्रकल्पात पाणी साठा असून सध्या होत असलेल्या पावसामुळे पाणीसाठ्यात वाढ होण्याची शक्यता आहे.

## गंगापूर फाटा येथे आता एसटी बसेसचा नियमित थांबा; प्रवाशांना दिलासा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** छत्रपती संभाजीनगर-पुणे-अहिल्यानगर महामार्गावरील गंगापूर फाटा (भेंडाळा फाटा) येथे आता एसटी बसेस नियमितपणे थांबणार आहेत. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विभागीय नियंत्रकांनी छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व संबंधित आगारप्रमुखांना याबाबत आवश्यक आदेश जारी केल्याने गंगापूर व परिसरातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गंगापूर फाटा हा अधिकृत बसथांबा असूनही अनेक एसटी बस येथे थांबत नसल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता. या समस्येबाबत सामाजिक कार्यकर्ते डॉ. आबासाहेब शिरसाठ यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर आमदार प्रशांत बंब यांनीही हा प्रश्न विभागीय नियंत्रकांच्या निदर्शनास आणून देत बसथांबा नियमित करण्याची मागणी केली होती.गंगापूर हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून ते महामार्गापासून सुमारे सात ते आठ किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे पुणे, अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगरकडे प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी गंगापूर फाटा हा महत्त्वाचा थांबा आहे.प्रवाशांच्या मागणीची दखल घेत विभागीय नियंत्रकांनी सर्व संबंधित आगारप्रमुखांना गंगापूर फाटा येथे नियमित बस थांबवून प्रवाशांच्या चढ-उताराची व्यवस्था सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे गंगापूर तालुक्यासह परिसरातील हजारो प्रवाशांची दीर्घकाळची मागणी पूर्ण झाली असून त्यांच्या प्रवासातील गैरसोय दूर होणार आहे.

## मटका व्यवसायीका विरोधात गंगापूर पोलिसांची धडक कारवाई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** शहरात सुरू असलेल्या बेकायदेशीर मटका व्यवसायीका विरोधात गंगापूर पोलिसांनी बुधवारी ८ जुलै रोजी धडक कारवाई करत तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल फोन, कॅल्क्युलेटर, स्कॅनर व इतर साहित्य असा एकूण २५ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार शहरातील राजीव गांधी चौकाजवळील जुने बसस्थानक परिसरात कैलास टी सेंटरच्या पाठीमागील पत्र्याच्या शेडमध्ये विनापरवाना मुंबई मटका जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यावरुन छापा टाकण्यात आला.

या कारवाईत दिलीप बळवंत घाडगे (रा. सखारामपंतनगर, गंगापूर), नवनाथ अंकुश कुंडाळकर (सध्या रा. बसस्थानक परिसर, गंगापूर, मूळ रा. भोर, जि. पुणे) आणि सुरेश शंकर फुलारे (रा. सखारामपंतनगर, गंगापूर) यांना ताब्यात घेण्यात आले.

छाप्यात रोख २ हजार २५० रुपये, तीन मोबाईल फोन, तीन कॅल्क्युलेटर, पेटीएम स्कॅनर, पावती बुक, पेन व इतर साहित्य असा एकूण २५,३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलीस अंमलदार राजेंद्र भिमराव बडे यांच्या फिर्यादीवरून गंगापूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असून आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

कारवाई पोलिस निरिक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार रमेश जारवाल व नागरे यांनी केली असुन पुढील तपास गंगापूर पोलीस करीत आहेत.

## निधन वार्ता

### वसंतराव लोखंडे



**टाकळीभान :** घोगरगाव येथील वसंतराव पंढरीनाथ लोखंडे, यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे, त्यांच्या पक्षात दोन मुले, चार मुली, सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे. फॅब्रिकेशन व्यवसायाचे सचिन लोखंडे व सागर लोखंडे यांचे ते वडील होते.

## एकाच रात्रीत दोन घरफोड्या

### चोरासह सोने खरेदी करणाऱ्या एकास अटक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** शहर व ग्रामीण भागात एकाच रात्री झालेल्या दोन घरफोड्यांचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात एका चोराला अटक करण्यात आली असून चोरीचे सोने खरेदी करणाऱ्या सहकारी पतसंस्थेच्या शाखा व्यवस्थापकालाही पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणातील आणखी एक आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे. काही दिवसांपूर्वी हॉटेल आराध्याचे संचालक सुरेश मापारी यांच्या घरातून १ लाख ९७ हजार रुपयांचा ऐवज, तर वैजापूर ग्रामीण भागातील शेतकरी रावसाहेब गायकवाड यांच्या बंद घरातून ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला होता. या दोन्ही घटनांमुळे परिसरात खळबळ उडाली होती. सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी रामेश्वर जंगल्या भोसले (रा. पांडेगव्हाण, ता. आष्टी, जि. बीड) याला अटक केली. त्याच्याकडून १० हजार रुपये रोख, ३० हजार रुपये किमतीच्या सोन्याच्या दोन बाळ्या आणि एक दुचाकी जप्त करण्यात आली. चौकशीत जाल्या उर्फ बोट्या बरांड्या भोसले (रा. गंगापूर) याचाही सहभाग निष्पन्न झाला असून तो फरार आहे. तपासादरम्यान चोरीतील काही दागिने ज्योती क्रांती को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, शाखा जवळा येथील शाखा व्यवस्थापक आकाश सुभाष राऊत याने खरेदी केल्याचे समोर आले. त्यालाही पोलिसांनी अटक केली असून चोरीचा माल आणखी कुठे विकला गेला आहे का, याचा तपास सुरू आहे. फरार आरोपीचा शोध व उर्वरित मुद्देमाल जप्त करण्यासाठी पोलिसांची कारवाई सुरू आहे.




सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गुरुवार दि .०२ जुलै २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १५८<br>६८०<br>७७० | ४-० | १३६<br>२३५<br>३३४ | ४९-३०-८१-<br>२६-०५ |

**कल्याण**

उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२०<br>३४६<br>६७० | ३-९ | २७०<br>२८९<br>२२५ | ९२-३४-०१-<br>७५-६९ |

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२७<br>२८०<br>२४४ | ०-७ | १२४<br>४६७<br>१३३ | ०८-१७-२५-<br>९३-७४ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

# वैदुवाडीत आरोपींच्या नातेवाईकांचा पोलिसांना घेराव!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** सावेडी उपनगरातील वैदुवाडी येथे खंडणी प्रकरणातील आरोपीला पंचनामा आणि घर झडती साठी नेले जात असताना आरोपींच्या नातेवाईकांनी आणि महिलांनी पोलिसांना घेराव घालत सरकारी कामात अडथळा आणला. यावेळी काही महिला पोलिसांवर धावून आल्याचा प्रकार घडला. या प्रकाराने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण झाले होते. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याबाबत गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

या घटनेची पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, दि. ६ जुलै रोजी रात्री पाईपलाईन रोडवरील कपड्याच्या दुकानात घुसून जबरदस्तीने कपडे नेत असताना पैसे मागितल्याचा राग आल्याने दोघाजणनी दुकानदाराला मारहाण करून खंडणी मागितली होती या प्रकरणी दुकानदार आकाश प्रकाश शिंदे यांनी ११२ वर कॉल करून पोलिसांची मदत मागितली होती. त्यावेळी तोफखाना पोलिसांचे पथक घटनास्थळी गेले असता आरोपी नितीन मच्छिंद्र शिंदे व त्याचा साथीदार विलास संतोष शिंदे (दोघे रा. वैदुवाडी) यांनी पोलिसांना धक्काबुक्की



केल्याप्रकरणी व सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी वाढीव कलम लावले होते. या घटनेतील विशाल शिंदे व नितीन शिंदे यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर घर झडतीसाठी व घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी नेले जात होते.

त्यावेळी वैदुवाडी येथील कमानी जवळ काही महिलांनी व नातेवाईकांनी पोलिसांना घेराव घालत आरोपींना नेण्यास मज्जाव करण्याचा प्रयत्न केला.

त्यावेळी काही महिलांनी पोलिसांच्या अंगावर धरून जात सरकारी कामात अडथळा आणला. यावेळी पोलीस उपअधीक्षक दिलीप टिपरसे, तोफखाण्याचे पो. नि. बालाजी वैद्य, तपास अधिकारी पो. उ.नि. प्रवीण पाटील यांच्यासह महिला अंमलदार व पोलिसांचे पथक उपस्थित होते. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात ८ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. महिला पोलिस अंमलदार यांनी याबाबत फिर्याद दिली.

# ‘स्मार्ट मीटर’ बसवू देणार नाही : खा. लंके

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राज्य सरकार एकीकडे सांगते की स्मार्ट मीटरची सक्ती नाही, मात्र दुसरीकडे शहरात व ग्रामीण भागामध्ये दमदाटी करून जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसविले जात आहेत. हा प्रकार तातडीने बंद करा. यापुढे जिल्ह्यात कुठेही स्मार्ट मीटर बसवू देणार नाही. वेळ पडल्यास जनतेच्या प्रश्नासाठी तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभे करू आणि जेलमध्येही जाऊ, असा थेट आणि आक्रमक इशारा खासदार निलेश लंके यांनी महावितरण प्रशासनाला दिला आहे.



महावितरण विभागाच्या गलथान कारभाराच्या विरोधात खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी महावितरणच्या कारभाराचा अक्षरशः पाढाच वाचला. अधिकाऱ्यांकडून होणारी पैशांची मागणी आणि शेवगाव तालुक्यात बांबूवर ओढलेल्या विजेच्या तारा यांसारख्या गंभीर बाबी या मोर्चामध्ये समोर आल्या.

अधिकाऱ्यांची अरेरावी आणि 'रामभरोसे' कारभार खासदार निलेश लंके यांनी अधीक्षक अभियंता विजयकुमार पवार यांना निवेदन देऊन सुनावले की, शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारींचे तातडीने निरसन करण्याचे काम महावितरण कार्यालयाने करावे. काही अधिकारी व कर्मचारी पैसे घेतल्याशिवाय कामच करत नाहीत, उलट विचारणा केली तर अरेरावीची भाषा वापरतात. ज्या गावांमध्ये सिंगल फेज योजना नाही, त्या गावांची यादी करून त्यांना तातडीने लाईट द्यावी. ते पुढे म्हणाले की, श्रीगोंदा तालुक्यात व नगर शहरामध्ये महावितरणच्या गलथान कारभारामुळे निष्पाप नागरिकांचा जीव गेला आहे. संबंधित दोषींवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्यांच्या कुटुंबीयांना मोठी आर्थिक मदत करावी आणि काम न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी. आम्ही केलेल्या पत्रव्यवहाराला केराची टोपली दाखवली जाते, आमचे काम वेळेवर होत नाही, असे यापुढे चालणार नाही. तुम्ही जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी काम करा. पावसाळ्यापूर्वी महावितरण विभागाने उपाययोजना करणे गरजेचे होते.

अधीक्षक अभियंता विजयकुमार पवार हे चांगले अधिकारी असले, तरी त्यांच्या हाताखालील महावितरणचा कारभार सध्या पूर्णपणे 'रामभरोसे' झाला आहे. शेवगाव तालुक्यात अक्षरशः बांबू वरती विजेच्या तारा ओढल्या आहेत, तर नगर शहरात बहुतांश भागातील डीपी उघड्या आहेत. महावितरण विभाग नागरिकांच्या जीवाशी खेळत असून येत्या पंधरा दिवसात नागरिकांच्या सर्व तक्रारींची सोडवणूक करावी, अशा कडक सूचना खासदार लंके यांनी दिल्या.

शेतकऱ्यांच्या वतीने निवेदनातील प्रमुख मागण्या आणि मुद्देः वाढीव बिले व भारनियमनः महावितरण कार्यालयाकडून अवाजवी व वाढीव लाईट बिल दिले जातात, ते त्वरित कमी करावे. ग्रामीण भागामध्ये सुरू असलेले अघोषित व अनियमित लोड शेडिंग (भारनियमन) तातडीने बंद करावे.

# धोक्याच्या सावटाखाली ग्रामीण वीज व्यवस्था

## सरपंच अंजना येवले यांची उपाययोजना करण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नगर तालुका :** नगर तालुक्यातील ग्रामीण भागात महावितरणच्या अनेक विद्युत वाहिन्या, वीज पोल आणि रोहित्रांची अवस्था अत्यंत जीर्ण झाली आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थी, शेतकरी आणि ग्रामस्थांच्या जीवितास धोका निर्माण झाला असुन गावोगावी तातडीने पाहणी करून धोकादायक विद्युत यंत्रणा बदलण्यात यावी अशी मागणी बहिरवाडीच्या सरपंच सौ. अंजना येवले यांनी केली आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी शेतातून जाणाऱ्या विद्युत वाहिन्या खाली लोंबकळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक ठिकाणी रोहित्र उघड्यावर असून त्यांना आवश्यक ते संरक्षण नसल्याने अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे. काही लोखंडी वीज पोलमध्येही विद्युत प्रवाह उतरत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांकडून केल्या जात आहेत. पावसाळ्याच्या दिवसांत ही परिस्थिती अधिक धोकादायक ठरत असून एखादी दुर्घटना घडल्यास त्याची मोठी किंमत मोजावी लागू शकते. तालुक्यातील अनेक गावांमध्ये आजही १९७० ते १९८० च्या दशकात उभारण्यात आलेले वीज पोल आणि वाहिन्याच वापरात आहेत. कालांतराने या यंत्रणेची झीज झाल्यामुळे पावसाळ्यात वारंवार बिघाड होत असून ग्रामीण भागातील वीजपुरवठा सतत खंडित होत आहे. परिणामी नागरिकांना वारंवार अंधाराचा सामना करावा लागत असून शेती, शिक्षण आणि दैनंदिन जीवनावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

# पर्यावरणाच्या रक्षणासाठी वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज : उपमहापौर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** पर्यावरणाचा वाढता ऱ्हास, बदलते ऋतुमान आणि वाढते प्रदूषण यामुळे मानवी आरोग्यासमोर गंभीर आव्हाने निर्माण होत आहेत. कोणत्याही ऋतूमध्ये ऊन, वारा, पाऊस आणि थंडीचा अनियमित अनुभव येत असल्याने पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन हा काळाचा अत्यावश्यक मंत्र बनला आहे. संत तुकाराम महाराजांनी शेकडो वर्षांपूर्वी वृक्षवल्ली आम्हा सोयरे या ओळींतून वृक्षांचे महत्त्व समाजाला पटवून दिले होते. त्याच विचारांचा वारसा पुढे नेत नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेच्या माध्यमातून संपूर्ण शहरात वृक्षारोपणाची लोकचळवळ उभी राहत असून नगरकर त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत. पावसाळा हा वृक्षारोपणासाठी सर्वोत्तम काळ असून प्रत्येक नागरिकाने जास्तीत जास्त झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. शहराच्या मध्यवर्ती भागात सारडा कॉलेजने ऑक्सिजन पार्क उभारून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे, असे प्रतिपादन अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर ड. धनंजय जाधव यांनी केले.



अहिल्यानगर महानगरपालिका आणि साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सारडा कॉलेज येथे नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या प्रसंगी हिंदसेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, अजित बोरा, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, उपप्राचार्य मिलिंद देशपांडे, गिरीश पाखरे, प्रा. राजेंद्र देशमुख, प्रा. माधुरी दीक्षित, ग्रीन आर्मीचे सदस्य प्रा. हर्षल आगळे, प्रा. प्रसाद बेडेकर तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी हिंदसेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी म्हणाले की, उपमहापौर ड. धनंजय जाधव यांनी ग्रीन सिटी मोहिमेच्या माध्यमातून समाजामध्ये वृक्षांचे महत्त्व आणि पर्यावरणाचा समतोल राखण्याचा जो संदेश दिला आहे, तो अत्यंत कौतुकास्पद आहे. सारडा कॉलेजने वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारली असून विद्यार्थ्यांमध्येही पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण केली जात आहे. वृक्षारोपण ही केवळ एका व्यक्तीची नव्हे, तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा.

यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा यांनीही उपमहापौर ड. धनंजय जाधव यांच्या ग्रीन सिटी मोहिमेचे मनापासून कौतुक केले.

# दारूच्या नशेत शिवीगाळ, धमकी ; तोफखान्यात तक्रार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** सावेडी परिसरातील समता चौक येथे राहणाऱ्या एका महिलेने शेजाऱ्यांच्या कथित त्रासाविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात एनसी (अदखलपात्र तक्रार) दाखल केली असून संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. तक्रारदार पूनम चंगेडिया (रा. समता चौक, सिव्हिल हडको, सावेडी, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, शेजारी राहणारे योगेश उर्फ सुहास बाळासाहेब जगताप, विमल बाळासाहेब जगताप आणि संध्या योगेश जगताप यांच्याकडून वारंवार त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीत म्हटले आहे की, योगेश उर्फ सुहास जगताप हे अनेकदा मद्यधुंद अवस्थेत घरासमोर येऊन तक्रारदार तसेच परिसरातील नागरिकांना अश्लील शिवीगाळ करतात. तसेच बाहेर भेटा, तुम्हाला बघून घेतो अशा स्वरूपाच्या धमक्या देत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. याशिवाय, घरातील महिला विमल जगताप व संध्या जगताप या खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देत असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.


## जाहीर प्रगटन

समस्त गावकरी कर्जत ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री/श्रीम बापु शिवा काळे रा कर्जत ता. कर्जत जि अहिल्यानगर यांनी मुलगा नामे श्री/श्रीम विघ्नहार्ता बापु काळे या नावे जन्म / मृत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म / मृत्यू कर्जत ता कर्जत जि. अहिल्यानगर या ठीकाणी दि २९/०९/२०२० रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबधीत दि ०४/०६/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यक्तीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**रवि सतवन**
**तहसिलदार कर्जत**



## जाहीर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की मौजे मिरजगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर येथील मिळकत, **मिळकतीचे वर्णन,** दावा मिळकत मौजे मिरजगाव, ता. कर्जत, जिल्हा अहिल्यानगर, येथील शेत जमीन मिळकत गट नं ६६ / २ चे क्षेत्र २.१६ पो. ख ०.०२ एकूण २ हे १८ आर यांसी चतु:सीमा पूर्वेस गट नं ६२, ६३,६४,६५ पश्चिमेस गट नं ६९, उत्तरेस गट नं ६७, दक्षिणेस- जुना नगर-सोलापूर रस्ता सदर मिळकत ही **निर्मला हिरालाल गांधी, कल्पना संजय मुनोत, मनिषा संजय बोरा, वंदना प्रशांत लोढा, डिंपल नितीन बोरा, प्रशांत हिरालाल गांधी** यांच्या वडीलोपार्जित मालकी हक्काची व कब्जे वाहिवाटीची आहे. दिनांक ०९/१०/२०२४ रोजी **कल्पना संजय मुनोत, मनिषा संजय बोरा, वंदना प्रशांत लोढा, डिंपल नितीन बोरा यांनी श्री प्रताप गुलाबराव तनपुरे व श्री. रविंद्र दत्तात्रय बोरूडे** यांचे नावे त्यांच्या स्वतंत्र हिस्स्याचे साठेखत / इसारपावती करून दिली, त्यानुसार कल्पना संजय मुनोत, मनिषा संजय बोरा, वंदना प्रशांत लोढा, डिंपल नितीन बोरा यांनी सदर मिळकतीची आमचे आशील यांना खरेदी करून देणे कायद्याने बंधनकारक आहे, त्या संदर्भात मे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर कर्जत यांचे कोर्टात विशेष दिवाणी दावा क्र २३ / २०२६ हा चालू आहे. तरी इतर कोणी हक्कसोड पत्र किंवा इतर कोणत्या दस्ताच्या आधारे मालकी हक्क सांगत असतील तर ते केवळ बनावट व बेकायदेशीर आहे तसेच त्यासाठी मे.सिविल जज सीनियर डिव्हीजन, कर्जत यांचे कोर्टात दिवाणी दावा चालू आहे. सदर मिळकती मध्ये आमचे आशील यांच्या नावे ( Lis Pendens) under Section 52 of Transfer of Property -Act 1882 नोंदविलेला आहे. तरी सदर मिळकतीचे कोणीही खरेदी खत अथवा साठे खत करू नये. जर तसे केले व त्यामुळे कोणाचे नुकसान झाले तर त्यास आमचे अशील जबाबदार राहणार नाही या साठी ही जाहीर नोटिस प्रसिद्ध केली असे.

नोटिस देणार तर्फे सही
**मिरजगाव, कर्जत** (शिक्का) **ॲड. प्रसाद रामचंद्र चव्हाण**
**दि.: ०६/०७/२०२६** कर्जत, ता. कर्जत, जि.अहिल्यानगर
मो.बा.८८८८५२०६८८,९४२३३८९२९४


# पसंतीच्या पोलीस ठाण्यांना डावलून बदल्या?

## सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांत नाराजी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** जिल्हा पोलीस दलातील प्रशासकीय बदल्यांच्या आदेशानंतर पोलीस वर्तुळात नाराजीची चर्चा रंगली आहे. विशेषतः पोलीस हेडकॉन्स्टेबल, सहाय्यक फौजदार तसेच पदोन्नतीवर पोलीस उपनिरीक्षक झालेल्या काही अधिकाऱ्यांना त्यांच्या पसंतीच्या पोलीस ठाण्यावर नियुक्ती न मिळाल्याने नाराजी वाढल्याचे बोलले जात आहे. सेवेच्या अखेरच्या टप्प्यात असलेल्या कर्मचाऱ्यांच्या अडचणींचा पुरेसा विचार झाला नसल्याची भावना व्यक्त होत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

४ जून रोजी जिल्हा पोलीस दलातील सुमारे ३०० अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्यांचे आदेश काढण्यात आले. या बदल्यांमध्ये पोलीस उपनिरीक्षक, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, सहाय्यक फौजदार, पोलीस हवालदार आणि पोलीस शिपाई यांचा समावेश आहे. यापैकी सुमारे ७० कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना एका वर्षासाठी स्थगिती देण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

प्रशासकीय बदली प्रक्रियेत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून तीन पसंतीची पोलीस ठाणे मागविली जातात. संबंधित ठिकाणी जागा उपलब्ध नसल्यास कर्मचाऱ्यांशी चर्चा करून पर्यायी पोलीस ठाणे देण्याची पद्धत असल्याचे सांगितले जाते. मात्र बदली प्रक्रियेत अनेकांना त्यांनी नमूद केलेल्या कोणत्याही पसंतीच्या ठिकाणी नियुक्ती मिळाली नसल्याची चर्चा पोलीस दलात सुरू आहे.

विशेष म्हणजे, पोलीस हेडकॉन्स्टेबल, सहाय्यक फौजदार तसेच पदोन्नतीवर पोलीस उपनिरीक्षक झालेल्या अनेक अधिकारी-कर्मचाऱ्यांची पुढील पाच ते सहा वर्षांत सेवानिवृत्ती होणार आहे. या काळात मुलांचे उच्च शिक्षण, विवाह, वृद्ध पालकांची जबाबदारी, स्वतःचे आरोग्य आणि कौटुंबिक अडचणी लक्षात घेता सेवेच्या अखेरच्या टप्प्यात घराजवळील किंवा पसंतीच्या पोलीस ठाण्यावर नियुक्ती मिळावी, अशी त्यांची अपेक्षा होती. मात्र तसे न झाल्याने अनेकांनी खाजगीत नाराजी व्यक्त केल्याचे सांगितले जात आहे.

पदोन्नतीवर पोलीस उपनिरीक्षक झालेल्या काही अधिकाऱ्यांमध्येही नाराजी असल्याची चर्चा आहे. इच्छित किंवा सोयीच्या ठिकाणी नियुक्ती न मिळाल्याने अनेकांचा अपेक्षाभंग झाल्याचे बोलले जात आहे. सेवेच्या अखेरच्या टप्प्यातील वैयक्तिक व कौटुंबिक परिस्थितीचाही विचार व्हायला हवा होता.अशी भावना काही अधिकारी व्यक्त करत असल्याचे समजते.

काही कर्मचारी या बदल्यांविरोधात न्यायालयात दाद मागण्याच्या तयारीत असल्याची चर्चा असून काही जण उर्वरित सेवा पूर्ण करण्याऐवजी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारण्याचाही विचार करत असल्याचे पोलीस वर्तुळात बोलले जात आहे.

दरम्यान संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक अडचणींचा विचार करून आवश्यक त्या बदल्यांचा फेरविचार करावा अशी मागणी पोलीस दलातील काही कर्मचाऱ्यांकडून होत असल्याची चर्चा आहे. या बदल्यांबाबत वरिष्ठ स्तरावर पुनर्विचार होणार का ? याकडे आता संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## द·ख·ल

# शिक्षण व सहकारातून रोजगार देणारे दूरदृष्टीचे लोकनेते घुले : पिसाळ



**एरंडगाव :** जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक, सहकार व शिक्षण महर्षी लोकनेते स्व.मारुतरावजी घुले पाटील यांच्या २४ व्या पुण्यस्मरणार्थ जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे, 'मारुतरावजी घुले पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहिल्यानगर' येथे अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. के. पंदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपप्राचार्य डॉ.के.आर.पिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.पी.ए.फटांगरे आणि डी.एल.एम.टी. समन्वयक प्रा.आर.आर. गीते यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रा.डॉ.एम.ए. शेख, प्रा.व्ही.डब्ल्यू.गोडसे, डॉ. एस. बी. दहातोंडे, डॉ. आर. ए. नेटके, प्रा. ए. के. आहेर, प्रा. एस. ए. राऊत, प्रा. एस. वाय. धरम, प्रा. एस.पी.औटी यांची उपस्थितीत होते. तसेच सना शेख, एम.बी.जिवडे,श्यामा वाळके,ऋतिक ताकपेरे व अल्तमश शेख यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एस.एम.बांगर यांनी केले तर आभार प्रा. के. एस. कराड यांनी मानले.

# नाना डोंगरे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार

**अहिल्यानगर :** यशवंत सेना व जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. पुण्यश्लोक



अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवानिमित्त शहरात झालेल्या धनगर समाजाच्या मेळाव्यात डोंगरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी अशोक सुर्यवंशी, प्राचार्य तुळशिराम भोजने, यशवंत सेनेचे शहराध्यक्ष कांतीलाल जाडकर, सरचिटणीस अजय जाडकर, मच्छिंद्र बिडगर, शर्मिला नलावडे, पुणे महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त रेश्मा पुणेकर आदी उपस्थित होते. स्व. किसन डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत असलेले पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह जिल्हाभर विविध सामाजिक उपक्रमांद्वारे आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

# जिल्ह्यात अपघात रोखण्यासाठी प्रशासन सज्ज



**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. जिल्ह्यातील अपघात वळण ठिकाणे, अतिक्रमण, धोकादायक चौक, ब्लॅकस्पॉट, अपूर्ण सुरक्षा उपाययोजना तसेच राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील त्रुटी दूर करण्यासाठी संबंधित विभागांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले. बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना नेते अभिजीत दादा पोटे यांनी जिल्ह्यातील रस्ता सुरक्षेशी संबंधित अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले. प्रवरा संगम परिसरातील अपघात वळण डिव्हायडर, रिफ्लेक्टर बोर्ड, झाडांच्या फांद्यांमुळे निर्माण होणारा धोका, टोल नाक्यांवरील वाहतूक कोंडी, पुणे-अहिल्यानगर महामार्गावरील अतिक्रमण, बेकायदा पार्किंग, शहरातील वाहतूक कोंडी, पादचारी सुरक्षेचा प्रश्न, छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील धोकादायक ठिकाणे तसेच पुलांवरील सुरक्षेच्या उपाययोजनांची आवश्यकता याकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. अभिजीत दादा पोटे यांनी मांडलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी संबंधित विभागांना तातडीने आवश्यक उपाययोजना करून निश्चित कालावधीत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

# खंडित विजपुरवठा, बसस्थानक अप्पर तहसील कार्यालयाची मागणी



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील बोधेगाव व परिसरातील नागरिकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत आमदार मोनिका राजळे यांची पावसाळी अधिवेशनामध्ये मुंबई येथे भेट घेऊन तीन प्रमुख विषयासाठी निवेदन सादर करण्यात आले. त्या मध्ये बोधेगाव येथील सतत खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करणे, नव्याने उभारण्यात येणाऱ्या एसटी बसस्थानकासाठी मंजूर असलेल्या रक्कमेत वाढ करणे तसेच बोधेगाव येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याची प्रमुख मागणी करण्यात आली. बोधेगाव हे शेवगाव तालुक्यातील महत्त्वाचे व्यापारी, शैक्षणिक व दळणवळणाचे केंद्र असून मराठवाड्याला जोडणारे प्रमुख प्रवेशद्वार म्हणून या गावाची ओळख आहे. सुमारे ४० ते ५० गावांतील नागरिकांचे दैनंदिन व्यवहार, शासकीय कामकाज, शेतीमालाची खरेदी-विक्री, शिक्षण, आरोग्य सेवा तसेच वाहतूक या सर्व बाबींसाठी बोधेगाववर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. त्यामुळे येथील मूलभूत सुविधा अधिक सक्षम करणे ही काळाची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. वीजपुरवठ्याबाबत करण्यात आलेल्या मागणीत बोधेगाव येथील वीज महावितरण कंपनीचा कारभार अनेकदा विस्कळीत होत असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. संबंधित अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्यामुळे रात्री-अपरात्री वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर दुरुस्तीच्या कामांना विलंब होतो. परिणामी नागरिक, व्यापारी, शेतकरी तसेच विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. शेतीपंपांचा वीजपुरवठा खंडित झाल्याने शेती उत्पादनावरही परिणाम होत आहे. त्यामुळे बोधेगाव येथे अतिरिक्त तांत्रिक कर्मचारी नियुक्त करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.

# खडकवासला तुडुंब; पुण्यात पुराचा इशारा!

## मुठा नदीत २८ हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग; भिडे पूल पाण्याखाली, नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** घाटमाथ्यावर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पुण्याची जीवनवाहिनी असलेले खडकवासला धरण शंभर टक्के भरले असून धरणातून मुठा नदीपात्रात सुमारे २८ हजार क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. या विसर्गामुळे मुठा नदीची पाणीपातळी झपाट्याने वाढली असून नदीपात्रातील रस्ते पाण्याखाली गेले आहेत. पुण्यातील ऐतिहासिक भिडे पूल पूर्णपणे पाण्याखाली गेला असून नदीपात्रातील मेट्रोच्या खांबांनाही पुराचा वेढा पडला आहे.

नदीपात्रात उभी असलेली अनेक वाहने पाण्यात बुडाली असून दोन पोकलेन यंत्रांचा केवळ वरचा भागच दिसत असल्याचे चित्र आहे. प्रशासनाने नदीकाठच्या सखल भागातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला असून नदीपात्रात किंवा पुलांवर गर्दी न करण्याचे आवाहन केले आहे.

पूरस्थितीचा आढावा घेण्यासाठी महापौर मंजुषा नागपुरे यांनी राजपूत नगर, पुलाचीवाडी, एकता नगर व निंबजनगर परिसराला भेट दिली. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनीही घटनास्थळी पाहणी करून पूरग्रस्तांना आवश्यक मदत केली जाईल, तसेच कायमस्वरूपी उपाययोजनांवर काम सुरू असल्याची माहिती दिली. नागरिकांच्या स्थलांतराचाही पर्याय विचाराधीन असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आळंदीत इंद्रायणी नदीला पूर आला असून नदीवरील चारही पूल पाण्याखाली गेले आहेत. अनेक भागांत पुराचे पाणी शिरल्याने नुकसान झाले आहे. खडकवासला धरणसाखळीतील चार धरणांमध्ये मिळून सुमारे १४ टीएमसी (४८ टक्के) पाणीसाठा उपलब्ध झाला असून पुणेकरांच्या पाणीटंचाईची चिंता दूर झाली असली, तरी सध्या पूरस्थितीमुळे प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.



## द • ख • ल

### मोशी दुर्घटना : बचावकार्य युद्धपातळीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या तातडीच्या सूचना

**पुणे :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मोशी कचरा डेपो येथे सुरू असलेल्या बांधकामादरम्यान डोंगराचा काही भाग कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर बचावकार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे.घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस, अग्निशमन दल, लष्कर, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (छऊठक्र) तसेच अन्य बचाव पथके घटनास्थळी दाखल होऊन बचाव व मदतकार्य सुरू केले आहे.या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव विनिता वेद सिंगल, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त विजयकुमार सूर्यवंशी तसेच पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून बचाव व मदतकार्य युद्धपातळीवर राबविण्याच्या सूचना दिल्या. दुर्घटनेत अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, तसेच जखमींवर तातडीने आणि प्रभावी वैद्यकीय उपचार उपलब्ध करून द्यावेत, असे निर्देश त्यांनी दिले आहेत.उपमुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार एनडीआरएफचे पथक घटनास्थळी दाखल होऊन बचावकार्य सुरू आहे. प्रशासनाकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून सर्व संबंधित यंत्रणा समन्वयाने कार्यरत आहेत.



### पिसर्वे विकास सोसायटी चेअरमनपदी बाळासाहेब कोलते

**माळशिरस :** पिसर्वे विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी बाळासो जयवंत कोलते यांची बिनविरोध निवड झाली. सासवड येथील सहाय्यक निबंधक कार्यालयात झालेल्या बैठकीत निवडणूक अधिकारी म्हणून अरमीन बागवान यांनी काम पाहिले.सन १९९२ साली स्थापना झालेल्या संस्थेची आर्थिक उलाढाल ५ कोटींपर्यंतची आहे. भविष्यात संस्थेला स्वतःची इमारत बांधण्याचा मानस निवडीनंतर बोलताना चेअरमन बाळासो कोलते यांनी व्यक्त केला . त्यांचा सत्कार आचार्य अत्रे सभागृहात प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते यांचे हस्ते करण्यात आला. याप्रसंगी सरपंच रवींद्र कोलते, संतोष कोलते, बाळासाहेब कोलते ,पोलीस पाटील संभाजी कोलते, केंद्रप्रमुख रोहिदास कोलते, माजी चेअरमन सुरेश कोलते ,मारुती वायकर, मच्छिंद्र कोलते , मारुती कोलते यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला संस्थेचे संचालक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्कूल कमिटीचे चेअरमन अरुण कोलते यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.



### ११ देशांचा प्रवास करून आलेल्या ग्लोबल वारीचे पुण्यात उत्स्फूर्त स्वागत

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** लंडन ते पंढरपूर असा ११ देशांतून भव्य प्रवास पूर्ण करून आलेल्या ग्लोबल वारीचे पुण्यात उत्साहात स्वागत करण्यात आले. पुण्याचे आराध्य दैवत असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात यूके येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील पादुकांचे विधिवत पाद्यपूजन करण्यात आले.यानंतर ग्लोबल वारीच्या संपूर्ण टीमचे श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनीलभाऊ रासने, सिद्धार्थ गोडसे, डॉ. अनिल खेडकर तसेच शेकडो वारकरी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्वागत समारंभानंतर ग्लोबल वारीचे आळंदीच्या दिशेने प्रस्थान झाले. भक्ती, परंपरा आणि जागतिक स्तरावर वारकरी संप्रदायाचा संदेश पोहोचविणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that Mr.Ayub Siddique Mulla and Mrs. Jahida Ayub Mulla are the Owners/Holders of Flat bearing No. 507 (old No.flat no.7) adm. 449 Sq. Ft. on the Fifth Floor in the building Devika Apartment in Devika Co. Op. Housing Society Ltd. Constructed on land bearing G.L.R. Sr. No. 390/948, House No. 2010-A, Gaffar Bag Street, Haveli, Pune 411001., within Pune Cantonment Board, Pune. The said flat is purchased from Mrs. Bina Ramesh Daswani vide Deed of Assignment dated 25/02/2026 registered at Haveli 10 at Sr.No. 6590/2026. Mr. Ayub Siddique Mulla and Mrs. Jahida Ayub Mulla states and declares that Original Agreement dated 06/06/1985, Haveli No.2 at Sr.No. 5968/1985 registered on 15/06/1985 executed by M/s. Jain Sharma Builders in favour of Mrs. Bina Ramesh Daswani, along with RR and Index II are lost and misplaced. The said owners have assured that they have clear and marketable title to the said Property. Now my client intends to obtained loan from Vastu Housing Finance Corporation Ltd and If any person, bank institution or authority having any claim, objection or interest or having in possession of above Original lost documents, should inform me on address given below within 7 days from the date of this notice.

Pune

Date:09/07/2026

**Adv. Vanashree G Kshirsagar**
Vastu Housing Finance Corp Ltd, Cts No 363/3,
Final Plot No 715/3, Apartment No 3, 2nd Floor,
A Wing, Pratisad, Jog Condominium, Shivaji Nagar,
Bhamburda, Haveli, Pune 411004
Mob. 9823598801,
Email - Vanashree.kshirsagar@vastuhfc.com

### लोणी-वाफगाव घाटात अतिवृष्टीने दरड कोसळली; सुदैवाने दुर्घटना टळली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** गेल्या पाच ते सहा दिवसांपासून पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका विविध भागांना बसत असून, आंबेगाव तालुक्यातील लोणी-वाफगाव मार्गावरील शिकोजीबाबा घाटात शुक्रवारी सकाळी अतिवृष्टीमुळे दरडसदृश मातीचा मलबा रस्त्यावर कोसळला. तसेच अनेक झाडे उन्मळून पडल्याने काही काळ वाहतुकीस अडथळा निर्माण झाला. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.आंबेगाव तालुक्याला खेड (राजगुरुनगर ) तालुक्याशी जोडणारा लोणी-वाफगाव हा महत्त्वाचा मार्ग असल्याने या घटनेमुळे वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. शिरदाळे येथील युवक आदिनाथ तांबे हे अभ्यासासाठी लोणीकडे जात असताना त्यांच्या निदर्शनास ही घटना आली. त्यांनी तातडीने शिरदाळेचे माजी उपसरपंच मयुर सरडे यांना याबाबत माहिती दिली. मयुर सरडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी लोंढे यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली.



घटनेची गंभीर दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ जेसीबी व आवश्यक यंत्रसामग्री घटनास्थळी पाठवून रस्त्यावर पडलेला मलबा आणि झाडे हटविण्याचे काम सुरू केले. अवघ्या एका तासात रस्ता वाहतुकीसाठी पुन्हा सुरळीत करण्यात आला.दरम्यान, परिसरात अजूनही मुसळधार पाऊस सुरू असल्याने घाट परिसरात पुन्हा दरड कोसळण्याची किंवा झाडे पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय अशा धोकादायक घाटरस्त्यांवरून प्रवास टाळावा आणि मोबाईलमध्ये प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी लोंढे यांनी केले आहे.

### महावितरण कर्मचाऱ्यांची भरपावसात कामगिरी
### येलवाडी, सांगुर्डी गावांचा वीजपुरवठा पूर्ववत

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** मुसळधार पाऊस आणि पूर परिस्थितीवर मात करत महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी येलवाडी आणि सांगुर्डी गावांचा खंडित झालेला वीजपुरवठा रात्रभर अखंड परिश्रम घेऊन यशस्वीरित्या पूर्ववत केला आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या या प्रयत्नांचे गावभर कौतुक होत आहे. चाकण एमआयडीसी उपविभागांतर्गत येणाऱ्या येलवाडी व सांगुर्डी गावांना जोडणारे वीज खांब पूराच्या तीव्र प्रवाहात वाहून गेले होते. त्यामुळे या दोन्ही गावांचा वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला होता. घटनेची माहिती मिळताच महावितरणच्या चाकण एमआयडीसी उपविभागाचे अभियंता प्रकाश शेळके, वासुलीचे शाखा अभियंता प्रमोद जाधव व कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि दुरुस्तीचे काम हाती घेतले.सतत चाललेला मुसळधार पाऊस आणि परिसरात मोठ्या प्रमाणात साचलेल्या चिखलामुळे महावितरणची वाहने घटनास्थळापर्यंत पोहोचू शकत नव्हती. अशा अत्यंत बिकट परिस्थितीतही कर्मचाऱ्यांनी हार न मानता नवीन वीज खांब आणि इतर आवश्यक अवजड साहित्य स्वतःच्या खांद्यावरून वाहून नेले. अंधार, पाऊस आणि चिखलाचे साम्राज्य अशा अत्यंत प्रतिकूल वातावरणात कर्मचाऱ्यांनी रात्रभर थांबून युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम पूर्ण केले. महावितरणच्या या तत्परतेमुळे आणि कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमांमुळे येलवाडी व सांगुर्डी गावांमधील वीजपुरवठा सुरक्षितपणे पूर्ववत करण्यात यश आले आहे. **कर्मचाऱ्यांवर कौतुकाचा वर्षाव :** पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे, अधीक्षक अभियंता सुरेश सवाईराम, कार्यकारी अभियंता केशव काळुमाळी यांनी कठीण परिस्थितीत कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे. तसेच स्थानिक नागरिकांनी महावितरणच्या या कामगिरीचे आणि कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे कौतुक केले आहे.



### पोंदेवाडीत दोन घरे पाण्यात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात गेल्या चार ते पाच दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असून पोंदेवाडी (ता. आंबेगाव) येथील शिवराम नाथा पोखरकर व आकाश धोंडीभाऊ पोखरकर यांची घरे पाण्याखाली गेल्याची घटना घडली आहे. या पावसामुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक रस्तेही पाण्याखाली गेले आहेत. पोखरकर यांची घरे पावसाच्या पाण्याने वेढली गेल्याने घरातील साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. तर मेंगडेवाडी, जारकरवाडी, पोंदेवाडी, लाखणगाव, लोणी, धामणी आदी परिसरात सलग सुरू असलेल्या पावसामुळे शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून शेतांना तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला असून उभ्या पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. मुसळधार पावसामुळे अनेक अंतर्गत रस्ते पाण्याखाली गेले. लाखणगावजवळील बेल्हा-जेजुरी मार्ग काही काळ पाण्याखाली गेल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. तसेच लोणी-वाफगाव मार्गावरील शिरदाळे नजीकच्या शिकोबा घाटात दरड कोसळल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली होती.अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, तसेच नदी, ओढे व घाट परिसरात जाणे टाळावे, असे आवाहन केले आहे दरम्यान, महसूल व कृषी विभागाने तात्काळ नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे करावेत आणि बाधित शेतकरी व नागरिकांना त्वरित आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष अनिल वाळुंज तसेच पोंदेवाडीचे माजी उपसरपंच संदीप पोखरकर यांनी केली आहे.

### शिष्यवृत्ती परीक्षेत ‘राजा रघुनाथराव’चा डंका

#### गुणवत्ता यादीत १९ पैकी १५ विद्यार्थी राजा रघुनाथरावचे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**भोर :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इ.८वी )भोर एज्युकेशन सोसायटी संचलित राजा रघुनाथराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाने याहीवर्षी नावलौकिकास कामगिरी केली असून १९ पैकी तब्बल १५ विद्यार्थ्यांनी तालुका गुणवत्ता यादीत स्थान मिळवल्याचे मुख्याध्यापक लक्ष्मण भांगे यांनी सांगितले.या माध्यमातून विद्यालयात दुरस्त शिक्षण (ऑनलाईन ) पद्धतीद्वारे मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केले जाते.याशिवाय शिक्षकांनी इंटरनेटचा वापर करून विद्यार्थ्यांना केलेले सखोल मार्गदर्शन यामुळे हे यश मिळाल्याचे संस्थेचे सचिव डॉ.सुरेश गोरेगावकर यांनी सांगितले. संस्थेच्या वतीने नुकताच शिष्यवृत्ती परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांसह मार्गदर्शक शिक्षक संतोष दळवी, पांडुरंग दानवले, संपत दूरकर आधी शिक्षकांचा सत्कार समारंभ पार पडला. यावेळी नियामक मंडळ अध्यक्ष प्रमोद गुजर,सचिव डॉ. सुरेश गोरेगावकर, उपाध्यक्ष मुकुंद तांबेकर,ज्येष्ठ संचालक सुरेश शाह, डॉ. प्रदीप पाटील, मुख्याध्यापक एल.एम.भांगे, पर्यवेक्षक विश्वास निकम, शिवाजी तामकर, सोमनाथ कुंभार आदी उपस्थित होते.



**हे आहेत गुणवंत विद्यार्थी**

कार्तिकी संतोष चंदनशिव, वरद मोहन पवार,मनस्वी बाबासाहेब जाधव, अनिष्का तुषार चव्हाण, चैतन्या बाबासाहेब जाधव, ज्ञानेश्वरी पांडुरंग आवाळे, तनिष्का नितीन खंडाळे, नंदिनी सचिन भगत, ज्ञानेश्वरी प्रकाश कुडले, नंदिनी रवींद्र बदक, अनित दशरथ गुजर, गार्गी राजेश शिवतरे, हर्षद सतीश बदक, विघ्नेश अंकुश चऱ्हाटे.

### आंबेगाव तालुक्यात अतिवृष्टी
### घोड पूर, अनेक बंधारे, पीके पाण्याखाली

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** गेल्या तीन-चार दिवसापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे व दि. ८ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे आंबेगाव तालुक्यात जनजीवन विस्कळीत झाले होते. या झालेल्या पावसामुळे ओढून आले तुडुंब भरून वाहू लागले असून घोड नदीला पूर आला होता. तर अनेक ठिकाणी पुलावरून पाणी गेल्यामुळे रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले होते.आंबेगाव तालुक्यासह डिंभे धरण परिसरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार व मुसळधार पावसामुळे संपूर्ण तालुक्यात पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. ऐन पावसाळ्यात विश्रांती घेतलेला पाऊस पुन्हा जोरदार बरसू लागल्याने शिवारात सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. ओढे, नाले, पाझर तलाव तुडुंब भरून वाहत असून घोडनदीने रौद्र रूप धारण केले आहे. त्यामुळे नदीकाठच्या अनेक गावांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली असून नागरिकांनी अत्यंत सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.सततच्या पावसामुळे हुतात्मा बाबू गेनू जलाशय, डिंभे धरण परिसरातील पाणीसाठ्यात अवघ्या तीन दिवसांत मोठी वाढ झाली आहे. यामुळे घोडनदीच्या पात्रातील पाणीपातळी सातत्याने वाढत असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. घोडनदीकाठावरील घोडेगाव पिंपळगाव (खडकी), कळंब, चांडोली, शिंदेवाडी, एकलहरे, निरगुडसर, भराडी, पारगाव यासह अनेक गावांतील नदीलगतच्या शेतीत पाणी शिरले आहे. दशक्रिया घाट, स्मशानभूमी, मंदिरे, बैलगाडा घाट, पाणीपुरवठा योजनांच्या मोटारी तसेच सार्वजनिक ठिकाणे आणि नदीकाठच्या शेतजमिनी पाण्याखाली गेल्या आहेत. काही ठिकाणी पाणीपुरवठा योजनांच्या मोटारी वाहून गेल्याच्याही घटना घडल्या आहेत.मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी ओढे, नाले आणि नद्या दुथडी भरून वाहत आहेत. पुलांवरून पाणी जात असल्याने वाहतूक विस्कळीत झाली असून काही रस्ते, पूल आणि भराव खचल्याने सार्वजनिक मालमत्तेचेही मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडू नये तसेच पूरग्रस्त भाग आणि नदीपात्राजवळ जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात येत आहे.



**Change Of Name**

my old name was
NIRALA
RANGNATH DHERE
my new name is
NIRALA
RANGNATH DHERE
it will be used for
all future purpose

## गणपतीच्या भक्तीमुळे सोशल मीडियावर रातोरात प्रसिद्ध झाले ‘बाळासाहेब बटाटेवाले’


**गणेश कुंभकर्ण । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** आजच्या सोशल मीडियाच्या युगात एखादी रील किंवा फोटो काही तासांत लाखो लोकांपर्यंत पोहोचतो. मात्र प्रसिद्धीच्या या गर्दीत भक्ती, श्रद्धा आणि साधेपणामुळे एखादी व्यक्ती चर्चेत येते, तेव्हा ती कहाणी अनेकांच्या मनाला स्पर्श करून जाते. अशीच प्रेरणादायी कहाणी आहे पुण्यातील महात्मा फुले मंडई येथील बाळासाहेब जगताप अर्थात ‘बाळासाहेब बटाटे वाले’ यांची मंडईमध्ये बटाट्याचा व्यवसाय करणारे बाळासाहेब जगताप हे गेल्या १५ वर्षांपासून आपल्या दुकानात गणपती बाप्पाची (शारदा गजाननाची ) मूर्ती ठेवून भक्तिभावाने सेवा करत आहेत. काही दिवसांपूर्वी एका फोटोग्राफरला मंडईत फिरत असताना बटाट्याच्या गोण्यांखाली असलेल्या लाकडी कपाटामध्ये विराजमान झालेली सुंदर गणेशमूर्ती दिसली. त्याने बाळासाहेब यांची परवानगी घेऊन त्या मूर्तीचे छायाचित्रण व व्हिडीओ शूटिंग केले आणि त्यावर आधारित रील इंस्टाग्रामवर अपलोड केली.

ही रील पाहताच गणेशभक्तांनी ती मोठ्या प्रमाणावर शेअर केली. काही तासांतच लाखो लोकांपर्यंत ती पोहोचली आणि बाळासाहेब जगताप यांची गणेशभक्ती सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली. त्यानंतर अनेक कंटेंट क्रिएटर्स, रीलस्टार आणि गणेशभक्त मंडईत येऊ लागले. अनेकांनी मूर्तीचे दर्शन घेतले आणि बाळासाहेब यांच्याशी संवाद साधला.दैनिक राष्ट्र सह्याद्रीशी बोलताना बाळासाहेब जगताप यांनी सांगितले की, या मूर्तीची स्थापना करून जवळपास पंधरा वर्षे झाली आहेत. आमचे दुकान दररोज सकाळी सहा वाजता उघडावे लागते.

त्यामुळे नियमित पूजा करण्यास वेळ मिळत नव्हता. २०१५ मध्ये माझा मुलगा गणेश याने आपल्या मित्राकडून शारदा गजाननाची ही सुंदर प्रतिकृती बनवून घेतली. गणपतीवर आमची प्रचंड श्रद्धा असल्याने ही मूर्ती दुकानात स्थापन करण्यात आली. ते पुढे म्हणाले, गणेशोत्सवात हीच मूर्ती आम्ही घरी आणतो. तिच्यासोबत आणखी एक गणेशमूर्तीची स्थापना करतो. दहा दिवस भक्तिभावाने पूजा-अर्चा केल्यानंतर अतिरिक्त मूर्तीचे विसर्जन करतो, तर ही मूळ मूर्ती पुन्हा मंडईतील दुकानात आणून प्रतिष्ठापित करतो.

सोशल मीडियावर मिळालेल्या प्रसिद्धीबद्दल बोलताना बाळासाहेब म्हणाले, या रीलमुळे मला ओळख मिळाली याचा आनंद आहे. मात्र त्याहून मोठा आनंद म्हणजे गणेशभक्त या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी येतात. त्यांच्या चेहऱ्यावरील समाधान पाहून मलाही समाधान आणि आनंद मिळतो. ही मूर्ती सर्व भक्तांसाठी दर्शनासाठी उपलब्ध आहे.बाळासाहेब जगताप हे शारदा गजानन मंडळाचे कार्यकर्ते असून



गणपतीवरील त्यांची निस्सीम श्रद्धा आणि भक्तीच त्यांच्या लोकप्रियतेचे खरे कारण ठरली आहे. बटाट्याच्या गोण्यांमध्ये विराजमान असलेली ही गणेशमूर्ती आज सोशल मीडियाच्या माध्यमातून लाखो भक्तांच्या श्रद्धेचे केंद्र बनली आहे. प्रसिद्धीच्या झोतात आल्यानंतरही बाळासाहेब यांचा साधेपणा आणि भक्तिभाव कायम असून, हीच बाब अनेकांना प्रेरणा देणारी ठरत आहे.

**जाहीर आवाहन**

**सर्व लोकांना कळवण्यात येते की, दत्तात्रेय मारुती साबळे. राहणार मुक्काम पोस्ट मधुबन सोसायटी, पिंपळे निलख, जगताप डेअरी, पिंपरी चिंचवड. ४११०२७**
यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन MH-१४ -DF-८३४८ असे असून त्याचा चासी नंबर ७१०३५, इंजिन नंबर ८५७४६ असा असून सदर चार चाकी वाहन त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती अनिता दत्ता साबळे यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी .
दिनांक - ०९/०७/२०२६
**श्रीमती अनिता दत्ता साबळे**
मधुबन सोसायटी, पिंपळे निलख , जगताप डेअरी, पिंपरी चिंचवड .
४११०२७

द•ख•ल

## पारनेर तालुका रिपब्लिकन सेना अध्यक्षपदी अतुल भालेराव



**भाळवणी :** रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशाने त्याचबरोबर पारनेर तालुक्यातील तमाम कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार अतुल भालेराव यांची रिपब्लिकन सेनेच्या पारनेर तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली. अतुल भालेराव यांच्या सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे यांनी त्यांना नियुक्तीचे पत्र दिले आहे. गेल्या दहा वर्षापासून अतुल भालेराव हे सामाजिक क्षेत्रामध्ये सक्रियपणे कार्यरत आहेत. या निवडीचे सर्व स्तरावरून स्वागत होत आहे. यावेळी राजेंद्र करंदीकर, सुनील शिंदे, दिलीपराव साळवे, हिरामण सोनवणे, दादाभाऊ पटेकर यांनी अभिनंदन केले आहे. या बैठकीला कानिफ आंबेडकर, बापू चेमटे, महेश पंडित, धनंजय साठे, दत्ता रोहोकले, आकाश भालेराव, साहेबराव मधे, पवन भालेराव, अजित तुपे, अमन तांबोळी, सुधीर सोनवणे, हरीश सूर्यवंशी, बाळासाहेब जाधव, सलीम शेख, प्रकाश पटेकर व कार्यकर्ते उपस्थित होते.

## भाळवणीत जोरदार पाऊस




**भाळवणी :** पारनेर तालुक्यातील भाळवणी व परिसरातील अनेक गावात मंगळवारी मध्यरात्रीपासून जोरदार पावसाने हजेरी लावली. बुधवारी सकाळी पावसाची संततधार सुरू असल्याने बाजारकरुंची तारांबळ उडाली. सकाळपासूनच वातावरणात उष्मा जाणवत होता. परिसरातील काळकूप, माळकुप, जामगाव, वडगाव आमली, दैठणे गुंजाळ,भांडगाव सह अनेक गावात जोरदार पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे बळीराजा सुखावला असून लांबलेल्या खरीप हंगामाची तयारी सुरू केली आहे. या पावसामुळे भाळवणीच्या आठवडे बाजारात व्यापारी व बाजारकरू यांची मात्र मोठी तारांबळ उडाली.

## ग्रामीण रुग्णालयातून ऑनलाईन विवाह नोंदणी प्रमाणपत्र सेवा सुरू करावी

**शेवगाव :** ग्रामीण भागातील नागरिकांना विवाह नोंदणी प्रमाणपत्र सहज व सुलभ पद्धतीने उपलब्ध व्हावे, यासाठी राज्यातील सर्व ग्रामीण रुग्णालयांमधून ऑनलाईन पद्धतीने विवाह नोंदणी प्रमाणपत्रासाठी अर्ज स्वीकारण्याची व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने आदेश निर्गमित करावेत, अशी मागणी ग्रामीण रुग्णालय शेवगावच्या संनियंत्रण व सल्लागार समितीचे अशासकीय सदस्य गणेश रांधवणे यांनी महाराष्ट्र शासनाकडे तसेच शेवगाव-पाथर्डी मतदारसंघाच्या आमदार मोनिका राजळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ग्रामीण भागातील नागरिकांना विवाह नोंदणी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अनेकदा संबंधित कार्यालयांमध्ये वारंवार जावे लागते. त्यामुळे वेळ, आर्थिक खर्च आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होतो. ग्रामीण रुग्णालयांमध्ये ऑनलाईन अर्ज स्वीकारणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मदत करणे आणि नागरिकांना शासनाच्या डिजिटल सेवांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्यास ग्रामीण नागरिकांची मोठी गैरसोय दूर होईल. यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने आवश्यक धोरणात्मक निर्णय घेऊन राज्यातील सर्व ग्रामीण रुग्णालयांमध्ये ही सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने शासन आदेश निर्गमित करावेत, तसेच आमदार मोनिका राजळे यांनीही शासनस्तरावर या मागणीचा पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा गणेश रांधवणे यांनी व्यक्त केली आहे.

## शिवदुर्ग संवर्धन प्रतिष्ठानतर्फे बितनगडात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**सुपा :** गड-किल्ले संवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिवदुर्ग संवर्धन प्रतिष्ठान, अहिल्यानगर यांच्या वतीने अकोले तालुक्यातील बितनगड किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेल्या अतिदुर्गम बितिका गावातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या, पॅड, पेन, पेन्सिल, पट्टी, खोडरबर, चित्रकला वही, रंगपेटी, अंकलिपी, वॉटर बॉटल आणि रेनसूट आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी शंकर गरड, संतोष आडसरे, अर्जुन राऊत, परमेश्वर भवर, संतोष टकले, सुशील सुरवसे, प्रशांत हळगावकर, मुरलीधर बारामते, मुकुंद दुबे, डॉ. माधव राजपांगे, संतोष करंजुले व सदस्य उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी निसर्ग, पर्यावरण व जैवविविधता संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा: रणजित राऊत

**माहिजळगाव :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, फक्राबाद येथे विद्यार्थ्यांमध्ये जैवविविधतेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जागतिक काजवा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांना काजव्यांचे पर्यावरणातील महत्त्व, त्यांचे जीवनचक्र, अधिवास, जैवविविधता संवर्धनातील भूमिका काजव्यांच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यक्रमात फक्राबाद चे सुपुत्र, युवा शास्त्रज्ञ, जैवविविधता संशोधक तथा फायरफ्लाईज एशियन असोसिएशन चे मंडळ सदस्य रणजित रावसाहेब राऊत यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत काजव्यांच्या प्रकाश निर्मिती मागील वैज्ञानिक कारण, हवामान बदल, रासायनिक कीटक नाशकांचा वाढता वापर, प्रकाश प्रदूषण आणि अधिवास नष्ट होणे यामुळे काजव्यांची संख्या झपाट्याने घटत असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी निसर्ग संवर्धनाची जबाबदारी स्वीकारून वृक्षसंवर्धन, रासायनिक प्रदूषण कमी करणे आणि जैवविविधतेचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी काजव्यांविषयी उत्सुकता व्यक्त करत विविध प्रश्न विचारले. कार्यक्रमादरम्यान काजव्यांवरील माहितीपर सादरीकरण, चित्रांच्या माध्यमातून मार्गदर्शन तसेच पर्यावरण संरक्षणाची सामूहिक शपथ घेण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक किरण फापाळे, शिक्षकवृंद राजेंद्र हजारे, भगवान साळुंखे, शिवाजी ढोबे, मंजीरी गाढवे, वर्षा साबळे, शिवांजली डूचे व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# भारताचे संविधान कोणीही बदलू शकत नाही : आठवले

**रावसाहेब निकाळजे । राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव : भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारत देशासाठी जे संविधान तयार करून दिलेल आहे. ते संपूर्ण जगात प्रसिद्ध असून असे हे मजबूत संविधान कुणीच बदलू शकत नाही असे स्पष्ट मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले गट) राष्ट्रीय अध्यक्ष ना. रामदास आठवले यांनी व्यक्त केले आहे.**



ते शेवगाव येथे आले असता त्यांचे शुभ हस्ते अहिल्यानगर मार्गावरील डॉ.आंबेडकर यांच्या सध्या असलेल्या अर्धाकृती पुतळ्याच्या ठिकाणी नव्याने पूर्णाकृती पुतळा उभारला जाणार असल्याने त्या पुतळ्याचा भूमिपूजन समारंभ झाले नंतर आखेगाव रोडवरील साईधन मंगल कार्यालयात तिसऱ्यांदा केंद्रीय राज्य मंत्री पदी निवड झाल्याबद्दल सत्कार मेळावा व दक्षिणेतील आरपीआयच्या कार्यकर्त्यांचा संकल्प मेळावा आयोजित कार्यक्रमात ना. आठवले बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्ह्याचे संपर्क प्रमुख श्रीकांत भालेराव हे होते.या वेळी आठवले म्हणाले की, डॉ .आंबेडकरांनी जी घटना निर्माण करून दिलेली आहे. ती सर्व जाती - धर्मातील वर्गसमूहाना न्याय देणारी असून शिवाय सर्व समावेश्यक स्वरूपाची असल्याने असे मजबूत असलेले संविधान बदलण्याची कुणामध्येही ताकद नसून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना निवडणुकीत दोन वेळा हार पत्करावी लागली असल्यामुळेच त्यांना नविलाजाने स्वतंत्र रिपब्लिकन पक्षाची स्थापना करावी लागली असून त्यांना अभिप्रेत असलेला रिपब्लिकन पक्ष आम्ही चालवत असून या पक्षात आम्ही वेग - वेगळ्या जाती व धर्म वर्गसमूहाच्या २४ आघाड्या स्थापन करून त्यांना न्याय देण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न असल्याचे सांगून सध्या राज्यात मातंग व बौद्ध समाजामध्ये उपवर्गीकरणाबाबत जो कलह निर्माण करण्यात आला आहे. तो दोन्हीही समाजातील वर्गांना न परवडणारा असून अ ब क ड या धोरणास माझा विरोध असून त्यामधून कुणावरही अन्याय होऊ नये असे माझे मत असल्याचेही ना.आठवले यांनी म्हटले असून मी मातंग समाजाचा आहे ही अशी चर्चा गेली अनेक दिवसापासून सबंध राज्यात सुरू असून मला एका कार्यकर्त्याने विचारले की, तुम्ही खरोखर मातंग समाजाचे आहात का त्यावर मी महार (बौद्ध) असल्याचे स्पष्टीकरण दिले आहे.

तसेच शेतकरी कर्ज माफी प्रमाणे राज्यातील मागासवर्गीय महामंडळाचे कर्ज माफ व्हावे ही जी मागणी पुढे येत आहे. त्याबद्दलही निश्चित प्रयत्न करण्यात येतील असेही शेवटी ना. आठवले यांनी सांगितले आहे. यावेळी सतिष मगर, विजय वाकचौरे, माजी खा. सुजय विखे पाटील, गौतम सोनवणे, श्रीकांत भालेराव, काकासाहेब खबाळकर, अशोक गायकवाड, विनोद निकाळजे, माजी मंत्री अविनाश महातेकर यांनी विचार व्यक्त केले.

डॉ. आंबेडकरांच्या स्वप्नातील रिपब्लिकन पक्ष ना. आठवलेच पुढे घेऊन जात असल्याचे म्हटले आहे. यावेळी अरुण मुंडे, ॲड. शिवाजीराव काकडे, सुरेंद्र थोरात, भीमा बागुल, संजय डोळसे, राजू जगताप, किरण दाभाडे, विवेक भिंगारदिवे, विनोद जाधव, राजू उबाळे, राजू जगताप, प्रवीण मोरे, अंबादास आरोळे, संजय भैलूमे, सतिष साळवे, भाऊ वाघमारे, सुनील मोरे, संजय डोळसे, अजित रणदिवे, भागवत शिंदे, चंद्रकांत कर्डक, राजेंद्र मगर, गौरव मगर, प्रदीप मोहिते, अमोल आहेर, राजू घुटे, निलेश जगधणे, अमोल मोहिते, राजेश गरुड, मधुकर मोहिते, बाबा खिलारे यांच्यासह आरपीआयचे कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी कार्यक्रमाचे मुख्य आयोजक व पक्षाचे दक्षिण जिल्हा प्रमुख सुनील साळवे यांनी प्रास्ताविक केले असून सूत्रसंचालन बापू मगरे यांनी केले तर आभार शहराध्यक्ष निरंजन बोरुडे मानले आहेत.

## भर पावसात ॲड. खेडकरांचे पोलीस ठाण्यासमोर आंदोलन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी :** शहरातील महाविद्यालयीन व शाळकरी मुलींचे छेडछाडीचे वाढते प्रकार, विविध प्रकारच्या सामाजिक गुन्हेगारीमुळे शहरात सर्वसामान्य लोकांसाठी वाढत चाललेले असुरक्षित वाताव, शाळा महाविद्यालयांच्या परिसरात वाढीव पोलीस बंदोबस्त देण्याची मागणी करत जगदंब प्रतिष्ठानचे संस्थापक ॲड प्रतीक खेडकर यांनी पोलीस स्टेशन समोर लाक्षणिक उपोषण आंदोलन केले. शहराच्या राजकीय इतिहासात प्रथमच पडत्या पावसात आंदोलकांनी ठिय्या मांडून बसत नागरिकांसह पोलिसांचेही लक्ष वेधले.

पाथर्डी शहरामध्ये वाढत चाललेली सामाजिक गुन्हेगारी, शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थिनींना रोड रोमिओ चा वाढता त्रास, शिक्षकांना गुन्हेगारी प्रवृत्ती कडून होणारी दमबाजी, भरधाव वेगाने दुचाकी गाड्या चालवत पादचाऱ्यांना वाढत चाललेले असुरक्षित वातावरण, दोन्ही बस स्थानकांवर होणारी गुन्हेगारी, अशा विविध पार्श्वभूमीवर यापूर्वी शहरात अनेक आंदोलने झाली. तात्पुरती मलम पट्टी करत पोलिसांनी लोकांची समजूत काढल्यानंतर काही दिवसानंतर पुन्हा पहिल्यासारखे वातावरण होई. गुन्हेगारांना राजश्रय मिळत असल्याने गुन्हेगारी फोफावत जाऊन पोलीसही हतबल राहिले. गुंडांची दहशत एवढी वाढली की, कशाप्रकारे फिर्याद घ्यायची व तक्रार देणाऱ्या विरुद्ध कशाप्रकारे उलट तक्रार नोंदवायची याच्यासाठी सुद्धा दलाल वाढले. नोंदलेल्या तक्रारी मिटवण्यासाठी सुद्धा दलाल वाढले. या सर्व प्रकाराची चर्चा शहरांमध्ये जाहीर रित्या सुरू झाली.

काही दिवसांपूर्वी पोलिस अधिकाऱ्यांच्या नव्याने नियुक्त झाल्या. कामकाजामध्ये काही बदल होईल असे नागरिकांना वाटत असतानाच मागील आठवड्यात एका विद्यालयाच्या आवारात शाळकरी मुलींची छेडछाड गुंड प्रवृत्तीच्या मुलांनी केल्याने लोक भावनेचा उद्रेक झाला.

## श्रीगोंदा तालुक्यात दमदार पाऊस

**लिंपणगाव :** जवळपास दोन महिने पावसाने हुलकावणी दिल्याने श्रीगोंदा तालुक्यातील खरीप हंगाम लांबणीवर पडला होता. त्यामुळे शेतकरी चिंतेत होते. मात्र ५ व ६ जुलै रोजी झालेल्या संततधार पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या जीवात जीव आला आहे. पेरणी साठी समाधानकारक पाऊस झाल्याने बियाणे घेण्यासाठी कृषी दुकानांमध्ये शेतकऱ्यांची गर्दी दिसत आहे. दरम्यान, धरण परिसरात जोरदार पाऊस सुरू असल्याने तालुक्यातील नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. संभाव्य पाणीप्रवाह वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पारनेरमध्ये ११ वीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स ण्ड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता अकरावीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'स्वागत समारंभ' उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर होते. कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर म्हणाले, विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी अभ्यासावर लक्ष केंद्रित न करता, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा, वाचन अशा विविध उपक्रमांत सहभागी होऊन आपला सर्वांगीण विकास साधला पाहिजे. बौद्धिक व शारीरिक क्षमतांचा योग्य समन्वय साधल्यास विद्यार्थी कठीण प्रसंगांना खंबीरपणे तोंड देऊ शकतील आणि आयुष्यात मोठी ध्येये साध्य करू शकतील. महाविद्यालय विद्यार्थ्यांना सामाजिक भान असलेला, प्रामाणिक आणि बहुआयामी व्यक्तिमत्व घडविणारी एक प्रयोगशाळा म्हणून काम करत आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी यशस्वी माजी विद्यार्थ्यांची उदाहरणे देऊन नवोदितांना यशाचे मंत्र दिले.

## संत निळोबाराय पायीदिंडी पालखी सोहळयाचे १० जुलैला प्रस्थान

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान ब वर्ग तीर्थक्षेत्र आणि प्रति पंढरपूर म्हणून प्रसिद्ध असलेले पारनेर तालुक्यातील श्रीक्षेत्र पिंपळनेर येथील, संतनिळोबाराय महाराज यांच्या पिंपळनेर ते पंढरपूर पालखी सोहळ्याच्या नियोजनाची बैठक पालखी सोहळा प्रमुख गोपाळकाका मकाशीर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. श्रीसंत निळोबाराय सेवा मंडळ व श्री संत निळोबाराय संस्थांच्या विद्यमाने, राज्यातील प्रमुख संतांपैकी एक असलेली. ९ व्या क्रमांकाची मानाची पायीदिंडी पालखी सोहळा म्हणून ओळख असणाऱ्या, श्रीसंत निळोबाराय पायीदिंडी पालखी सोहळा या वर्षी श्रीक्षेत्र पिंपळनेर ते पंढरपूर या पालखी सोहळ्याचे प्रस्थान होणार असून, संत निळोबारायांचा पायीदिंडी पालखी सोहळा हा शुक्रवार सकाळी १०:३० वाजता निळोबारायांच्या राहत्या वाड्यातून समाधी संजीवन समाधी मंदिराकडे होईल. श्रीक्षेत्र पिंपळनेर येथून संत निळोबारायांच्या पालखी सोहळ्याचे दुपारी ३ वाजता संजीवन समाधी मंदिरातून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान होईल. त्या अगोदर एक तासाची किर्तनसेवा ह भ प मोहन आनंद महाराज परंदवडेकर पंढरपूर यांची होईल.या प्रसंगी भास्कर गिरीजी महाराज देवगड हे हजर राहणार आहेत. तसेच अनेक दिग्गज किर्तनकार व मोठ्या संख्येने वारकरी भाविकभक्त आणि दिंडी चालक विणेकरी व चोपदार महिलाभगिनी मोठ्या संख्य प्रस्थान प्रसंगीची महापूजा हि अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी पंकज आशिया, आनंद भंडारी व पो. अधी. यांच्या हस्ते होईल. अभंग गाथेचा प्रकाशन सोहळा, पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील, ना. उदय सामंत व ना.दत्तामामा भरणे, अण्णासाहेब हजारे, पद्मश्री पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. सदर कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष पारनेरचे आ. काशिनाथ दाते हे राहणार आहे.

## वर्ष उलटले, काटेवाडी-सोमठाणे बंधाऱ्याची दुरुस्ती रखडली

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**शेवगाव :** गतवर्षी शेवगाव तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी व अवकाळी पावसाने मोठे नुकसान केले होते. अनेक ठिकाणी नद्या व नाल्यांना आलेल्या महापुरामुळे शेतजमिनींचे बांध फुटले, सुपीक माती वाहून गेली, उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले. तालुक्यातील आखेगाव खरडगाव, वरूर, भगुरसह अनेक गावांतील जनजीवन काही दिवस विस्कळीत झाले होते. या पुरामध्ये आखेगाव परिसरातील काटेवाडी-सोमठाणे हद्दीवरील महत्त्वाच्या बंधाऱ्याच्या बाजूचा भरावही वाहून गेला होता. मात्र या घटनेला जवळपास वर्षभराचा कालावधी लोटूनही संबंधित बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम अद्याप सुरू झालेले नसल्याने परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

पुरानंतर प्रशासनाकडून पंचनामे करण्यात आले, नुकसानीचा आढावाही घेण्यात आला. काही ठिकाणी दुरुस्तीची कामेही हाती घेण्यात आली. मात्र काटेवाडी-सोमठाणे येथील बंधाऱ्याच्या भरावाच्या दुरुस्तीकडे संबंधित विभागाने दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. परिणामी, यंदाही पावसाळा सुरू झाल्यानंतर या बंधाऱ्याची सुरक्षितता धोक्यात आली आहे.

सदर बंधारा परिसरातील शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचा असून भूजल पातळी वाढविणे, विहिरींना पाणी टिकवून ठेवणे आणि शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात त्याची मोठी भूमिका आहे.

## टाकळी ढोकेश्वर सोसायटीचा खिलारी यांच्या नावाने ठराव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीची धामधूम सुरू असून, उमेदवारांना पाठिंबा देण्यासाठी विविध कार्यकारी सहकारी संस्थांमध्ये ठराव मंजूर करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे.या पार्श्वभूमीवर टाकळी ढोकेश्वर येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सीताराम खिलारी सर यांच्या नावाने पाठिंब्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.



ठराव मंजूर करण्याची अंतिम मुदत १६ जुलै असून, त्यानुसार आयोजित बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या ठरावाचे सूचक विलास रामदास झावरे तर अनुमोदक मल्हारी गणपत धुमाळ होते. ठरावाची संपूर्ण प्रक्रिया सोसायटीचे सचिव विजय गायकवाड यांनी पार पाडली. बैठकीस ज्येष्ठ नेते बबनराव पायमोडे, चेअरमन नारायण यशवंत झावरे, मोहन शंकर रांधवन, शिवाजी काशिनाथ खिलारी, जयसिंग पाटील झावरे, बबन सावळेराम पायमोडे, विलास रामदास झावरे,मल्हारी गणपत धुमाळ, महेश गोवर्धन पाटील, श्रावण गायकवाड, बबन बांडे, दौलत जेजुरकर तसेच संचालिका अलका बांडे व सुंदराबाई गोरडे उपस्थित होत्या. उपस्थित सर्व संचालकांनी चर्चेनंतर सीताराम खिलारी यांच्या नावाला एकमुखी पाठिंबा दर्शवत ठराव मंजूर केला.

# आ. रोहित पवार यांच्या आंदोलनाचे यश

## कांद्याच्या वाढीव दराचा कर्जत-जामखेडला १८७ कोटींचा लाभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**कर्जत :** कांद्याच्या पडलेल्या दराविरोधात आमदार रोहित पवार यांनी राज्यभर केलेल्या आंदोलनाचा कर्जत-जामखेडमधील शेतकऱ्यांनाही फायदा झाला असून आंदोलनामुळे वाढलेल्या कांद्याच्या दरामुळे तब्बल १८७ कोटी रुपयांचा अधिकचा लाभ स्थानिक शेतकऱ्यांना झाला आहे. कर्जत-जामखेडसह संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांना या वाढीव दराचा फायदा झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

कर्जत आणि जामखेड या दोन्हीही तालुक्यातील शेतकरी कांद्याच्या लागवडीकडे मोठ्या प्रमाणात वळला होता. मात्र अनिश्चित दरामुळे शेतकऱ्यांच्या पदरी निराशा येत होती. गत हंगामात कांद्याच्या दराने निच्चांकी पातळी गाठली आणि बाजारात कांदा विक्रीसाठी आणल्यानंतर त्यातून चार पैसे मिळण्याऐवजी वाहतूक खर्चही स्वतःच्या खिशातून करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली होती. यातूनच शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ येऊन ठेपली होती. या दुष्टचक्रातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी आमदार रोहित पवार यांनी थेट रस्त्यावर उतरत सरकारला जाब विचारण्यास सुरवात केली. आंदोलनाच्या घोषणेपूर्वी ७०० ते ८०० रुपये प्रति क्विंटल या भावाने कांदा विकावा लागत होता, पण आंदोलनाची घोषणा करताच केंद्र सरकारने ती १२०० रुपये प्रती क्विंटल हमीभावाने नाफेडच्या माध्यमातून कांद्याची खरेदी करण्याची घोषणा केली. परंतु हा भावही तोकडा असल्याने त्यात वाढ करण्यात यावी अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आणि त्यासाठी त्यांनी थेट रस्त्यावर उतरत सरकारच्या विरोधात दंड थोपटले.

सुरवातीला कांद्याची मोठी बाजारपेठ असलेल्या लासलगाव (नाशिक), चांदवड (नाशिक) यासह पुण्यातील मंचर भागात शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन उभे केले. कर्जत-जामखेड मतदारसंघातही पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलने करुन कांद्याच्या हमीभावात वाढ करण्याची मागणी केली.

कृषी विभागाकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार कर्जत तालुक्यात गत हंगामात कांद्याचे हेक्टरी सरासरी २० टन याप्रमाणे एकूण २ लाख ९१ हजार टन उत्पादन झाले होते. यापैकी ३० टक्के कांद्याची तातडीने विक्री केली गेली. उर्वरित ७० टक्के कांद्याला म्हणजेच २ लाख ४ हजार टन कांद्याला सरासरी ७ हजार रुपये प्रति टन वाढीव दराचा फायदा झाला. यासह जामखेड तालुक्यात सरासरी हेक्टरी १५ टन याप्रमाणे कांद्याचे एकूण ९३ हजार ३१५ टन उत्पादन झाले असून यापैकी काढणी होताच शेतातूनच विक्री केलेला ३० टक्के कांदा वगळला तर उर्वरित ७० टक्के म्हणजेच ६५ हजार ३२० टन कांद्याला देखील सरासरी ७ हजार रुपयेच भाव मिळाला.

# आडगावमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ

## एकाच रात्री तीन घरांवर डल्ला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोल्हार** : राहाता तालुक्यातील आडगाव खुर्द येथे चोरट्यांनी कायद्याचा धाक नसल्याचा गैरफायदा घेत अक्षरशः धुमाकूळ घातला आहेत. ६ जुलैच्या मध्यरात्री ते ७ जुलैच्या पहाटेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी एकापाठोपाठ एक तीन घरांना लक्ष्य करून तीन लाखांहून अधिक रोख रक्कम, दागिने आणि दुचाकीची चोरी केली. या धाडसी चोरीच्या सत्रामुळे परिसरातील नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली असून, रात्रीची पोलीस गस्त नेमकी आहे तरी कुठे ? असा संतप्त सवाल नागरिकाकडून विचारला जात आहे. राहाता तालुक्यातील आडगाव खुर्द येथील फिर्यादी कैलास बापू कडलग यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी २० हजार रोख आणि सोने चांदीचे दागिने असा १ लाख ६१ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. हे कमी म्हणून की काय, चोरट्यांनी याच गावातील सोमनाथ शेळके यांच्याही घराचे कुलूप तोडले. त्यांच्या घरातून ७० हजार रुपयांची रोख रक्कम, ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीच्या दोन अंगठ्या व महागड्या साड्या अशा लाखो रुपयांच्या वस्तुवर चोरट्यांनी डल्ला मारला. इतकेच नाही तर नानासाहेब शेळके यांच्या घराबाहेर उभी असलेली हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर मोटरसायकल (एम. एच. १७ ए.टी.३५३२) देखील चोरट्यांनी चोरून नेली. एकाच रात्री तीन ठिकाणी झालेल्या या चोरीच्या सत्रामुळे गुन्हेगारांचे धाडस किती वाढले आहे, हे स्पष्ट होते. लोणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हेगारांना पोलिसांची कोणतीही भीती उरलेली नाही, हेच या घटनेवरून सिद्ध होत आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या कष्टाची कमाई आणि मालमत्ता सुरक्षित नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप आहे. आता पोलीस प्रशासन केवळ गुन्हा दाखल करून शांत बसणार की ? या धाडसी चोरट्यांच्या मुसक्या आवळून गस्ती वाढवणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वारंवार घडणाऱ्या घरफोडीच्या घटनांमुळे आता नागरिक असुरक्षित झाले आहेत.

# श्रीगोंदा दुय्यम कारागृहातून ३५ कैद्यांची नाशिकला रवानगी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा** : येथील दुय्यम कारागृहातील शिस्तभंग करणाऱ्या आणि कारागृहातील वातावरण बिघडविणाऱ्या कैद्यांविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर तब्बल ३५ कैद्यांची नाशिक मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. त्यामध्ये ३२ पुरुष व २ महिला आरोपींचा समावेश आहे.

तसेच आणखी तीन आरोपींनाही येत्या काही दिवसांत नाशिक कारागृहात पाठविण्यात येणार असल्याची माहिती दुय्यम कारागृहाचे जेलर बाबासाहेब कारखिले यांनी दिली आहे. ब्रिटिशकालीन श्रीगोंदा दुय्यम कारागृहात जुन्या नियमानुसार ३५ ची क्षमता असतानाही त्यामध्ये रोजच आरोपीची संख्या वाढतच असल्यामुळे गंभीर प्रश्न निर्माण होत होते. यावर कारवाई करण्यासाठी तसेच एक दिवस कारागृहात मोठ्या प्रमाणात धिंगाणा घातल्याने पो. नि. संजय ठेंगे यांनी याबाबत तहसीलदार , जिल्हा सत्र न्यायालय यासह वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा केल्यावर त्यांना प्रशासनाकडून श्रीगोंदा दुय्यम कारागृहातून ३५ कैद्यांची नाशिकला रवानगी करण्यास परवानगी मिळाली.

त्यानुसार आज ३२ पुरुष व २ महिला आरोपींचा समावेश आहे. तसेच आणखी ३ आरोपींनाही येत्या काही दिवसांत नाशिक कारागृहात पाठवण्यात येणार आहे. यामुळे दुय्यम कारागृहातील शिस्त अबाधित ठेवण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे . या निर्णयामुळे कारागृहातील मस्तीखोर आणि शिस्तभंग करणाऱ्या आरोपींना स्पष्ट इशारा मिळाल्याची चर्चा आहे.दरम्यान, तहसीलदार सचिन डोंगरे व पो. नि. संजय ठेंगे यांनी समन्वय साधून कायदेशीर प्रक्रियेनुसार ही कारवाई प्रभावीपणे राबविली.

# पहिल्या मजल्यावरून पडून मजुराचा दुर्दैवी मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : शहरातील नालेगाव अमरधाम परिसरात सुरू असलेल्या इमारतीच्या बांधकामादरम्यान पहिल्या मजल्यावरून खाली पडल्याने एका मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाला. कैलास किसन जाधव (वय ४६, रा. निंबोडी, ता. जि. अहिल्यानगर) असे मृत मजुराचे नाव आहे. मंगळवारी (दि. ७) दुपारी कैलास जाधव हे बांधकामावर काम करत असताना त्यांचा पाय घसरून ते पहिल्या मजल्यावरून थेट सिमेंटच्या जमिनीवर कोसळले. या अपघातात त्यांच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाली. सहकारी मजुरांनी त्यांना तातडीने शहरातील पॅसिफिक हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांनी तपासणीअंती उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलिसांनी रुग्णालयात धाव घेत प्राथमिक नोंद केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक चिटणीस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांनी घटनास्थळी पाहणी केली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस हवालदार योगेश कवाष्टे करीत आहेत.

# तिसगावातील गोमांस विक्री प्रकरणातील तिघे चार तालुक्यांतून हद्दपार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी** : तिसगाव (ता. पाथर्डी) येथे गोमांस विक्री, गोवंश जनावरे क्रूरपणे डांबून ठेवणे, त्यांना चारा-पाणी न देणे तसेच कत्तल करून मांस विक्री केल्याप्रकरणी गुन्हे दाखल असलेल्या तीन आरोपींना चार तालुक्यांतून सहा महिन्यांसाठी हद्दपार करण्यात आले आहे. हद्दपार करण्यात आलेल्यांमध्ये रेहान सलीम कुरेशी (२७), जव्वाद सलीम शेख (१९) आणि अमजद नूरमोहम्मद शेख (५२), सर्व रा. तिसगाव, यांचा समावेश आहे.

या तिघांविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम १९६० अंतर्गत दोन गुन्हे दाखल आहेत. वारंवार प्रतिबंधात्मक कारवाई करूनही संबंधितांकडून बेकायदेशीर गोमांस विक्री व गोवंश जनावरांवरील क्रूरतेचे प्रकार सुरूच असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

त्यामुळे महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ५५ अन्वये त्यांच्याविरुद्ध हद्दपारीचा प्रस्ताव पोलीस अधीक्षकांकडे पाठविण्यात आला होता. प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित आरोपींना पाथर्डी, अहिल्यानगर, शेवगाव व नेवासा या चार तालुक्यांतून सहा महिन्यांसाठी हद्दपार करण्यात आले. पाथर्डी पोलिसांनी त्यांना दौलावडगाव (ता. आष्टी, जि. बीड) येथे सोडून, वास्तव्यास असलेल्या परिसरातील जवळच्या पोलीस ठाण्यात महिन्यातून एकदा हजेरी लावण्याच्या सूचना दिल्या आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पाथर्डी पोलिसांनी केली.

# पुणतांबा-श्रीरामपूर मार्गावर भीषण अपघात

## दुचाकीस्वार ठार, पत्नी गंभीर जखमी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पुणतांबा** : पुणतांबा-श्रीरामपूर मार्गावरील चारीच्या वळणाजवळ बुधवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास दुचाकी आणि चारचाकी वाहनाची जोरदार धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला, तर त्याची पत्नी गंभीर जखमी झाली. जखमी महिलेवर शिर्डी येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघातातील पती-पत्नी हे कोपरगाव तालुक्यातील चासनळी येथील रहिवासी आहेत. अपघाताची माहिती मिळताच ग्रामस्थ आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. ग्रामीण रुणालयाच्या रुग्णवाहिकेतून जखमी महिलेला तातडीने शिर्डी येथे उपचारासाठी हलविण्यात आले. तिची प्रकृती गंभीर असल्याचे पोलिसांनी सांगितले. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही वाहनांचा वेग जास्त असल्याने अपघाताची तीव्रता वाढली. पुणतांबा-श्रीरामपूर मार्ग चांगला असल्याने या ठिकाणी वाहनांचा वेग अधिक असतो. विशेषतः चारीच्या वळणाजवळ वारंवार अपघात होत असून हा परिसर 'अपघातप्रवण' ठरत आहे. या ठिकाणी अनेक अपघातांत निष्पाप नागरिकांचा बळी गेल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने स्पीड ब्रेकर उभारावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. गरीब कुटुंबातील पतीचा मृत्यू आणि पत्नी गंभीर जखमी झाल्याने संबंधित कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# दुकान भाड्याने देण्याचे आमिष

## शिर्डीतील लॉजमध्ये तरुणीचा विनयभंग । आरोपीला अटक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शिर्डी** : दुकान भाड्याने देण्याचे आमिष दाखवून एका ३४ वर्षीय विधवा तरुणीला शिर्डीतील लॉजमध्ये नेऊन तिचा विनयभंग केल्याप्रकरणी शिर्डी पोलिसांनी दिलीप रामभाऊ गोंदकर (वय ६१, रा. प्रसादनगर, शिर्डी) याला अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिन्नर तालुक्यातील पीडित महिलेच्या पतीचे निधन झाले असून ती आपल्या दोन आजारी मुलांचा सांभाळ करत आहे.

आर्थिक अडचणींमुळे ती रोजगाराच्या शोधात होती. याच काळात कल्याण येथील एका मैत्रिणीमार्फत तिची आरोपी गोंदकर याच्याशी ओळख झाली. गोंदकर याने वारंवार संपर्क साधत शिर्डी येथे स्वतःच्या मालकीचा दुकान गाळा भाड्याने देण्याचे आमिष दाखवून महिलेला बोलावले. त्यानंतर तिला दूध डेअरी कार्यालयात तसेच डेअरीच्या मालकीच्या 'हॉटेल साई सत्कार'मधील एका खोलीत नेऊन तिच्या इच्छेविरुद्ध अश्लील स्पर्श करून लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. पीडित महिलेच्या तक्रारीवरून शिर्डी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमान्वये विनयभंगाचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली.

दरम्यान, आरोपीने स्वतःला 'हनी ट्रॅप'मध्ये अडकविण्यात आल्याचा दावा केला होता. मात्र, शिर्डी उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांनी सखोल चौकशी करून घटनेतील वस्तुस्थिती पडताळली. चौकशीदरम्यान आरोपीचा दावा निष्फळ ठरल्यानंतर त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. नातेवाईकांकडून दबाव येऊनही निष्पक्ष कारवाई केल्याबद्दल पोलीस अधिकारी अमोल भारती व तपास पथकाचे परिसरातून कौतुक होत आहे.

# निवृत्तीनाथांच्या पालखी दिंडीचे श्रीरामपूर शहरात भव्य स्वागत

## बेलापूरकरांनीही केले दिंडीचे स्वागत । आज पालखीचे राहूरीकडे करणार प्रस्थान

















*श्रीरामपूर : श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील संत श्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज संस्थांनच्यावतीने आषाढी एकादशीस पंढरपूरला जाणाऱ्या निवृत्तीनाथांच्या पालखी व दिंडीचे श्रीरामपूर नगरीमध्ये आगमन झाले.श्रीरामपूरकरांनी केले जंगी स्वागत केले.*

**भरत थोरात । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : नाशिक जिल्यातील श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वरहून आषाढी एकादशीसाठी पंढरपूरकडे जाण्यासाठी निघालेल्या श्रीसंत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे व लाखो वारकरी सहभागी झालेल्या दिंडीचे हरीनामाच्या व निवृत्ती महाराजांच्या जयजयकारात व विठुरायाच्या, हरिच्या जय घोषणात श्रीरामपूर नगरीमध्ये बुधवारी जंगी स्वागत झाले.

संत निवृत्तीनाथांच्या पालखीचे नेतृत्व ह.भ.प.मोहन महाराज बेलापूरकर हे करीत आहेत.दिंडी पालखीचे समवेत पुजारी ह.भ.प. जयंत गोसावी, मानकरी ह.भ.प. बाळकृष्ण महाराज डावरे, निवृत्तीनाथ संस्थानचे अध्यक्ष राहुल साळुंखे, पालखी सोहळा प्रमुख माधवदास राठी, विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख नवनाथ गांगुर्डे, विश्वस्त व सचिव श्रीपाद कुलकर्णी आदींच्या प्रमुख सहभागी अहेत.

श्रीरामपूर-संगमनेर रोड वरील जुन्या जकात नाक्याजवळ नगराध्यक्ष करण ससाणे, उपनगराध्यक्ष कांचन सानप, प्रांताधिकारी किरण सावंत पाटील, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, मुख्याधिकारी उकिर्डे आदी उपस्थित होते.

***पालखीचे श्रीरामपूरात आगमन***

*झाल्यानंतर रथातून तरुणांनी व भाविकांनी विठु नामाच्या जयजयकारात उतरवून शोभायात्रेचे मेनरोड मार्गे श्रीराम मंदिरात आणली श्रीराम मंदिराचे विश्वस्त मंडळ अध्यक्षा प्रणिती गिरमे, रोनक गिरमे, दीपेश सुर्यवंशी व उपाध्ये परिवारातील अशोक उपाध्ये, गौतम उपाध्ये परिवार आदींनी पालखी पादुकांची पुजा केली.*

*यावेळी भाविकांना सेवाभावी तरुण मंडळे, सामाजिक संघटना, कार्यकर्ते यांनी बिस्कीटे, पाण्याच्या बाटल्या, चिवडा पाकिटे, लाडू, केळी, खाद्यपदार्थ, खिचडी वाटपाचे दरवर्षीपेक्षा अधिक स्टॉल लागले होते. इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे माध्यमातून डॉक्टर्स व नर्सेसनी वारकर्यांची मोफत तपासणी केली.*

### वारकऱ्यांना दिली यांनी नित्यसेवा

*श्रीरामपूर येथील शिवा ट्रस्ट मेडीकल महाविद्यालयाच्या च्या दोनशे विद्यार्थ्यांनी सुमारे पंधराशे वारकऱ्यांना वैद्यकीय सेवा दिली व पदसेवा केली. विश्व हिंदू परिषद बजरंग दल उत्तर महाराष्ट्र सेवा प्रदान करत यावेळी, श्रीरामपूर नॉर्दन बँच येथे विश्व हिंदू परिषद प्रखड अध्यक्ष अमित मुथा व नाशिक येथिल विश्व हिंदू परिषद चे सेवाभावी सेवा दिली.या सेवेसाठी श्रीरामपूर मेडिकल असोसिएशन ग्रामिण रुणालय यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शहरात तृतीयपंथी समाजाकडून वारकऱ्यांची सेवाभावी आदरातिथ्य वारकऱ्याना नित्यरूपी सेवा दिली. बाजार समिती च्या व्यापारी हमाल पंचायतीतर्फे सन्मान करून दिंडीतील भाविकांना भंडारा देण्यात आला. बेलापूर येथे उपबाजार समिती आवारात भोजनाची व्यवस्था करण्यात आली.*

**छायाचित्र संकलन : अमोल कदम, अनिल पांडे, सुनिल पांढरे, संजय पगारे**